रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २४३
www.ramprahar.com
◆ रविवार, २२ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

चारित्र्यनिर्मिती हाच भक्कम नेतृत्वाचा पाया/२
रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४
उरण येथे आमदार चषक क्रिकेट स्पर्धा/८

## व्यावसायिक एलपीजी पुरवठ्यात २० टक्क्यांनी वाढ



**नवी दिल्ली :** आखाती प्रदेशात सुरू असलेल्या युद्धामुळे भारतात एलपीजीचा तुटवडा निर्माण झाल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर आता केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने राज्यांच्या व्यावसायिक गॅस कोट्यात २० टक्क्यांनी अतिरिक्त वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. २३ मार्चपासून हा निर्णय लागू होणार आहे. त्यामुळे एकूण वाटप आता संकटपूर्व पातळीच्या ५० टक्क्यांपर्यंत पोहचणार आहे. सरकारचे लक्ष विशेषतः अन्न सेवा क्षेत्र आणि सामुदायिक स्वयंपाकघरांवर केंद्रित असून जनतेला दिलासा देणे आणि अत्यावश्यक सेवांमध्ये कोणताही व्यत्यय येणार नाही याची खात्री करणे हा त्यामागील उद्देश आहे. दरम्यान, ५० टक्के कोट्यातून व्यावसायिक गॅस मिळवण्यासाठी सर्व व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांना तेल विपणन कंपन्यांकडे नोंदणी करावी लागणार आहे.

# कुशल मनुष्यबळ तयार करणार

■ मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन; रतन टाटा विद्यापीठात दीक्षांत समारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

सर्व क्षेत्रांमध्ये आघाडी घेण्यासाठी राज्यात कौशल्यसंपन्न मनुष्यबळ निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे आणि स्पर्धेच्या युगात आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ महाराष्ट्र निश्चितपणे तयार करेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि.२१) येथे केले. मुंबई येथील रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षांत समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

समारंभाला उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, राज्यपाल जिष्णू देव वर्मा, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री मंगलप्रभात लोढा, रतन टाटा विद्यापीठाच्या संस्थापक कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौशल्य विकासाचे महत्त्व ओळखून देशात कौशल्य विकास मंत्रालयाची स्थापना आणि स्किल इंडिया ही व्यापक चळवळ उभी केली. महाराष्ट्रानेही या उपक्रमात पुढाकार घेत कौशल्य विकासाला प्राधान्य दिले आहे.



महाराष्ट्र सरकारने टाटा विद्यापीठाची स्थापना करून कौशल्याधारित शिक्षणाला नवी दिशा दिली आहे. या विद्यापीठाच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जात असून १० हजार महिलांना एआय प्रशिक्षण देण्याचा उपक्रम विशेष उल्लेखनीय आहे, असे सांगून मुख्यमंत्र्यांनी विद्यापीठाचे अभिनंदन केले व पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या तसेच स्वतः व कुटुंबाच्या प्रगतीसोबतच देशाच्या उन्नतीतही योगदान देण्याचा संकल्प मनात ठेवावा, असे आवाहन केले.

### नव्या तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करा -उपराष्ट्रपती

यावेळी उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी पदवीधर विद्यार्थ्यांना संबोधित करताना कौशल्य विकास, रोजगार क्षमता आणि नवीन युगातील तंत्रज्ञानाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. हा दीक्षांत समारंभ म्हणजे केवळ शैक्षणिक यश साजरे करणे नाही, तर कुशल मनुष्यबळाचे जागतिक केंद्र बनण्याच्या भारताच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे, असे ते म्हणाले. आधुनिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांनी आपल्या अभ्यासक्रमात सातत्याने सुधारणा केल्या पाहिजेत तसेच कौशल्य विकास व नव्या युगातील तंत्रज्ञानावर अधिक लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन त्यांनी केले.



## पनवेलमध्ये रास्तभाव रेशन दुकानदारांच्या मागण्यांसंदर्भात बैठक

■ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत चर्चा


**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील रास्तभाव रेशन दुकानदारांच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने पनवेल येथील प्रशासकीय भवनात महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्यामुळे आणि त्यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक शनिवारी (दि.२१) अप्पर तहसीलदार कार्यालय हॉलमध्ये पार पडली.



या बैठकीला जिल्हा पुरवठा अधिकारी सोनावणे, तहसीलदार मीनल भामरे-भोसले, पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, तालुका पुरवठा अधिकारी श्रीमती धानवे, नायब तहसीलदार राजश्री जोगी यांची उपस्थिती होती. यावेळी रास्तभाव रेशन दुकानदारांच्या विविध अडचणी, प्रलंबित प्रश्न आणि त्यांच्या मागण्यांवर सखोल चर्चा करण्यात आली.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील तिघांचा मृत्यू



**पालघर : प्रतिनिधी**

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर पालघर जिल्ह्यातील ढेकाळे येथील वाघोबा खिंड परिसरात शनिवारी (दि. २१) भीषण अपघाताची घटना घडली. अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतले आणि मनोर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी हलवले. दरम्यान, अपघातानंतर घटनास्थळावरून फरार झालेल्या अज्ञात वाहनचालकाचा शोध पोलीस करीत आहेत.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कार्ला येथील सभामंडपासाठी पाच लाखांची देणगी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार्ल्याची आई एकविरा ही समस्त आगरी-कोळी समाजाचे श्रद्धास्थान असून या पवित्र स्थळी भाविकांच्या सुविधेसाठी एकविरा पायथा मंदिरासमोर सभामंडप उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर वेहरगाव ग्रामस्थांनी शनिवारी (दि. २१) पनवेल येथे येऊन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेत सभामंडप उभारणीसाठी सहकार्य करण्याची विनंती केली. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सामाजिक बांधिलकी जपत तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत सभामंडपासाठी पाच लाख रुपयांची देणगी जाहीर केली.

भाविकांना अधिक सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि धार्मिक स्थळाचा विकास व्हावा हा आपला नेहमीच प्रयत्न असल्याचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यावेळी स्पष्ट केले. दरम्यान, वेहरगाव ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, वेहरगावचे माजी सरपंच गणपत पडवळ, सुरेश गायकवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य मधुकर पडवळ, उद्योजक चंद्रकांत शेलार, एकविरा आई देवस्थानचे उपाध्यक्ष सागर देवकर, खजिनदार विकास पडवळ, माजी सरपंच अशोक पडवळ, पंचायत समिती सदस्य राजूशेठ देवकर, मनसे मावळ तालुकाध्यक्ष अशोक कुटे, पोलीस पाटील अनिल पडवळ, एकविरा पायथा मंदिर व्यवस्थापक संतोष देवकर अदी उपस्थित होते.

## पंतप्रधान मोदींची इराणच्या राष्ट्राध्यक्षांशी चर्चा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पश्चिम आशियामध्ये इस्रायल, अमेरिका विरुद्ध इराण यांच्यातील तणाव शिगेला पोहोचला असताना भारताने या वादात शांतता प्रस्थापित करण्यासाठी मोठे राजनैतिक पाऊल उचलले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. २१) इराणचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मसूद पेजेश्कियन यांच्याशी फोनवरून सविस्तर चर्चा केली. गेल्या आठ दिवसांतील या दोन्ही नेत्यांमधील ही दुसरी चर्चा असून भारताने या प्रदेशातील

### शांततेसाठी मांडली भूमिका



शांतता आणि स्थिरतेसाठी पुन्हा एकदा आग्रही भूमिका मांडली आहे.

पंतप्रधान मोदींनी राष्ट्राध्यक्ष पेजेश्कियन यांना ईद-उल-फितर आणि इराणचे नवीन वर्ष नवरोज निमित्त शुभेच्छा दिल्या. हा सण पश्चिम आशियात शांतता, स्थिरता आणि समृद्धी घेऊन येईल, अशी आशा पंतप्रधान मोदींनी यावेळी व्यक्त केली. या शुभेच्छांसोबत त्यांनी पश्चिम आशियात बिघडत चाललेल्या सुरक्षा व्यवस्थेवर तीव्र चिंता व्यक्त केली.

या संवादादरम्यान पंतप्रधान मोदींनी पश्चिम आशियातील बिघडत चाललेल्या परिस्थितीवर भारताची भूमिका अत्यंत स्पष्टपणे मांडली. त्यांनी प्रामुख्याने प्रादेशिक सुरक्षा, जागतिक व्यापार आणि मानवी हित या तीन गोष्टींवर भर दिला. विशेष म्हणजे होर्मुझची सामुद्रधुनी हा समुद्री मार्ग सुरक्षित राहणे अनिवार्य असल्याचे पंतप्रधान मोदींनी सांगितले. युद्धामुळे होणारी निष्पाप नागरिकांची जीवितहानी आणि मालमत्तेच्या नुकसानीबद्दल पंतप्रधानांनी खोलवर दुःख व्यक्त केले.

## सौदीतील हल्ल्यात भारतीयाचा मृत्यू

**रियाध :** सौदी अरेबियातील रियाध येथे १८ मार्च रोजी एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाला आहे. याबाबत भारतीय दूतावासाने शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत.

भारतीय दूतावासाने 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे की, १८ मार्च रोजी घडलेल्या अलीकडील घटनांमुळे रियाध येथे एका भारतीय नागरिकाचा दुर्दैवी मृत्यू झाला असून त्याबद्दल आम्ही मनःपूर्वक शोक व्यक्त करतो. दूतावास मृत व्यक्तीच्या कुटुंबियांशी आणि स्थानिक अधिकाऱ्यांशी सतत संपर्कात आहे तसेच आवश्यक ती सर्व मदत करण्यासाठी कटिबद्ध आहे.

## लोणावळ्यात हायप्रोफाईल जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

५० लाखांचा मुद्देमाल जप्त; २२ जणांवर गुन्हा दाखल

**लोणावळा : प्रतिनिधी**

लोणावळा शहरातील कुणेनामा परिसरातील एका बंगल्यात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी शनिवारी (दि.२१) पहाटे धाड टाकली. या कारवाईत रोख रक्कम, महागडे मोबाईल आणि अलिशान गाड्यांसह एकूण ४९ लाख ६४ हजार ७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी बंगल्याचा मालक आणि जुगार खेळणाऱ्यांसह एकूण २२ जणांवर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कुणेनामा (ता. मावळ) येथील एका बंगल्यात ही धडक कारवाई करण्यात आली. तेथे तीन पानी जुगार खेळताना आरोपी रंगेहाथ मिळून आले. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

## रायगडात रमजान ईद उत्साहात साजरी



**अलिबाग : प्रतिनिधी**

ईद-उल-फित्र अर्थात रमजान ईदचा सण शनिवारी (दि. २१) रायगड जिल्ह्यात सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. ईदनिमित्त मुस्लिम बांधवांनी मशिदीमध्ये सामुदायिक नमाज (प्रार्थना) अदा केल्यावर आलिंगन देत एकमेकांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.

### मुस्लिम बांधवांकडून सामुदायिक नमाज अदा

चंद्रदर्शन शुक्रवारी झाल्यामुळे शनिवारी रमजान ईद साजरी करण्यात आली. अलिबाग शहरातील जामा मशिदीत सकाळीच मुस्लिम बांधवांनी रमजान ईदची सामुदायिक नमाज अदा केली. यावेळी मौलानांनी कुराण पठण करून उपस्थित मुस्लिम बांधवांना रमजान ईदचे महत्त्व सांगितले. नमाज अदा केल्यानंतर मशिदीबाहेर पोलीसांनी गुलाबपुष्प देऊन सर्व मुस्लिम बांधवांचे स्वागत करीत त्यांना शुभेच्छा दिल्या. शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातदेखील मुस्लिम बांधवांनी ईदची नमाज अदा करण्यासाठी मशिदीत गर्दी केली होती. जिल्ह्यातील २३६ मशिदी, २८ दर्गाह, १९ मदरसा आदी ठिकाणी नमाज पठण करण्यात आले.

ईदनिमित्त मुस्लिम मोहल्ल्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. घरोघरी शिरकुर्मा तयार करण्यात आला होता. एकमेकांच्या घरी शिरकुर्म्याचे वितरण करण्यात आले. घरी येणाऱ्या पाहुण्यांना आवर्जून शिरकुर्मा खायला दिला जात होता.

दरम्यान, ईदच्या काळात कायदा व सुव्यवस्था रहावी यासाठी पोलिसांनी विशेष काळजी घेतली होती. ८७ पोलीस अधिकारी, ५६९ पोलीस अंमलदार, तीन दंगल नियंत्रण पथके, १२ स्ट्रायकिंग फोर्स, ५९ वाहतूक अंमलदार तैनात करण्यात आले होते.



# चारित्र्यनिर्मिती हाच भक्कम नेतृत्वाचा पाया

## ■ उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांचे नागपुरात प्रतिपादन
## ■ २९व्या भारतीय युवा संसद परिषदेचे उद्‌घाटन

**नागपूर : प्रतिनिधी**

भारतीय युवा संसद परिषद हे केवळ चर्चेचे व्यासपीठ नसून ते भविष्यातील जबाबदार नागरिक घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे. या परिषदेच्या माध्यमातून तुमच्या विचारांना आकार दिला जातो. चारित्र्याची जडणघडण होते. चारित्र्यनिर्मिती हाच भक्कम नेतृत्वाचा पाया आहे. जर आपले आयुष्य चारित्र्य संपन्न असेल, तर आपले नेतृत्व प्रभावी ठरेल, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी शनिवारी येथे केले.



रेशीमबाग येथील महर्षी व्यास सभागृहात २९ व्या भारतीय युवा संसद परिषदेचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सह सरकार्यवाह डॉ. कृष्ण गोपाल, केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. श्रीनिवास वरखेडी, भारतीय युवा संसद परिषदेचे राष्ट्रीय संयोजक आशुतोष जोशी व्यासपीठावर उपस्थित होते.

उपराष्ट्रपती म्हणाले की, कोणत्याही देशाची क्षमता आणि सामर्थ्य हे त्या देशाच्या तरुण लोकसंख्येच्या आकारावर आणि ताकदीवर अवलंबून असते. भारताकडे तरुणांची मोठी संख्या ही जमेची बाजू आहे. आज देशातील सुमारे ६५ टक्के लोकसंख्या ३५ वर्षांखालील आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली केंद्र सरकारने तरुणांच्या शिक्षण, कौशल्य आणि नेतृत्व विकासासाठी अनेक उपक्रम सुरू केले असल्याचे ते यावेळी म्हणाले.

भारतीय युवा संसद नॅशनल ट्रस्टच्या गेल्या दोन दशकांपासून सुरू असलेल्या अविरत सेवेचे त्यांनी यावेळी कौतुक केले. भारतीय युवा संसदेच्या देशाच्या कानाकोपऱ्यात परिषदा आयोजित करण्यात आल्या आहेत. देशातील तरुणांना जोडणारा एक महत्त्वाचा दुवा म्हणून त्यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे ते यावेळी म्हणाले.

देशाच्या अमृत काळात आपण सर्वजण मिळून २०४७ पर्यंत विकसित भारताचे उद्दिष्ट गाठण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवले आहे. यशाचा हा आलेख गाठण्यात युवकांची भूमिका महत्त्वाची असणार आहे.

# चवदार तळे येथे पुस्तक, बिस्किट आणि पाणीवाटप

**चौक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना ही वीज उद्योगात अग्रेसर असलेली संघटन असून ती वेळोवेळी अनेक समाज उपयोगी उपक्रम राबवित असते.

सामाजिक बांधिलकी जपत यावर्षी २० मार्च महाड येथील चवदार तळे येथे क्रांती दिनाचे औचित्य साधत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांना पुस्तके, पाणी आणि बिस्कीट वाटप करण्यात आले, यात सुमारे पाच हजार पाण्याच्या बाटल्या आणि चार हजार बिस्कीट पॅकेट आणि दोनशे पुस्तकांचा समावेश आहे.

या कार्यक्रमाचे उद्‌घाटन संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. संजय घोडके यांच्या हस्ते करून उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी संघटनेचे केंद्रीय सरचिटणीस संजयजी मोरे, भांडुप परिमंडळ मुख्य अभियंता संजय पाटील, पेण मंडळ अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड, कार्यकारी अभियंता गोरेगाव, आर.जे.पाटील, कार्यकारी अभियंता पनवेल ग्रामीण विभाग विद्यासागर शिंदे, संघटनेचे केंद्रीय माजी उपसरचिटणीस किशोर आहिवाळे, केंद्रीय राज्य उपाध्यक्ष शैलेश आडे, गणेशजी मुरकुटे, मनोज सूर्यवंशी, भांडुप परिमंडळ अध्यक्ष विजय शिरसाळे सचिव रमेश अहिरे, गणेश वाघ, लक्ष्मीकांत गलांडे, संजय जाधव, विलास खताळ, दीक्षांत वाघ, संतोष शेळके राहुल मोगले सुनील आडगाले, श्रीकांत शिरसे, हर्षवर्धन ओवाळ, सुजित भगत व गोरेगाव विभागीय अध्यक्ष राहुल राजभर, गोरेगाव सचिव नईम शेख, राजेंद्र भिंगारे, अजिज तांबोळी, अनिल भोई, विकास पाटील, अमीर शिगवण, विठ्ठल वाघमारे, बबन दासगावकर, सिद्धेश भेंगुर्डे, अनिल भोये आदींसह अनेक उपस्थित होते.



# रणरणत्या उन्हामुळे नागरिक हैराण

**खोपोली : प्रतिनिधी**

दिवसेंदिवस आता उन्हाची तीव्रता खुपच जाणवू लागली आहे. यामुळे घराबाहेर पडताना छत्री, स्कार्फ, गॉगल, टोपी आदि साधनांचा वापर करावा लागत आहे. या उन्हामुळे प्रत्येक व्यक्तीची अंगाची लाही-लाही होत आहे. यामुळे नागरिक चांगलेच हैराण झाले.



सकाळी दहा वाजल्या पासूनच उन्हाच्या तडाख्यामुळे शरिरातून घामाच्या धारा वाहू लागत आहे. यामुळे शरीरातील पाणी कमी होऊन डोकेदुखी, चिडचिडेपणा, थकवा असा त्रास जाणवू लागले आहे. उष्णतेशी संबंध आल्यास उष्माघात होतो. थकवा येणे, ताप येणे, त्वचा कोरडी पडणे, भूक न लागणे, चक्कर येणे, निरुत्साही होणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बैचेनी व अस्वस्थता, बेशुध्दावस्था ह्या उन्हाममुळे निर्माण होत आहे.

तालुक्यात उन्हाचा पारा वाढलेला दिसत असून या रखरखत्या उन्हाच्या कडाक्याने नागरिक कमालीचे हैराण झाले. उन्हापासून बचाव करण्याकरिता पांढरे शेले व शुभ्र खादीच्या कपड्यांमध्ये वाढ झाली आहे. मार्च महिन्याच्या प्रारंभीच वातावरणात आणखी चढ-उतार होत आहे.

**रणरणत्या उन्हामुळे घराच्या बाहेर पडणे अशक्य होत असून तरी काही महत्त्वाच्या कामासाठी जावे लागते. या उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी स्कार्फ, गॉगलचा आधार घ्यावा लागतो.**
**-पवित्रा पाटील, विद्यार्थी**

# धनगर समाज भवनाला गती देणार -खासदार सुनील तटकरे

**नागोठणे : बातमीदार**

धनगर समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मी कटीबद्ध आहे, असा ठाम विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केला. नागोठणेजवळील वेलशेत येथे जय मल्हार धनगर समाज संस्थेच्या समाजभवनाचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते दिमाखदार वातावरणात पार पडले.

धनगर समाजाने डोंगरकपारीत राहूनही गेल्या ६५ वर्षांपासून वार्षिक स्नेहसंमेलनाची परंपरा जपली आहे. या परंपरेमुळे समाजातील एकजूट अधिक बळकट झाली आहे. आता हीच एकजूट अधिक मजबूत करण्यासाठी स्वतःच्या मालकीच्या जागेत भव्य समाजभवन उभारण्याचा संकल्प करण्यात आला आहे.



यावेळी खासदार तटकरे म्हणाले की, समाजभवनाचा आराखडा सर्व सोयी-सुविधांचा विचार करून उत्कृष्ट बनवावा. निधी उभारणीसाठी आम्ही पूर्ण सहकार्य करू. तसेच उद्घाटनालाही मी स्वतः उपस्थित राहीन. त्यांनी समाजाच्या पदाधिकाऱ्यांना कामात कोणताही विलंब न करता त्वरित सुरुवात करण्याच्या सूचना दिल्या.

या कार्यक्रमाला विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. यावेळी खासदार सुनील तटकरे यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते किशोर जैन, रोहा पंचायत समिती सदस्य समृद्धी संतोष कोळी, शिवराम शिंदे, नागोठणे विभाग अध्यक्ष संतोष कोळी, रोहा पंचायत समिती सदस्या समृद्धी संतोष कोळी, नागोठणे माजी सरपंच विलास चौलकर, माजी उपसरपंच मोहन नागोठणेकर, अनंता देशमुख, उदय जवके, प्रमोद जांबेकर, सचिन कळसकर, वणी सरपंच प्रगती आवाद, सुधाकर पारंगे, जय मल्हार धनगर समाज संस्थेचे जिल्हाध्यक्ष मधुकर ढेबे, माजी अध्यक्ष गंगाराम कोकळे, उपाध्यक्ष रामभाऊ केंडे, कार्याध्यक्ष रामा बोडेकर, खजिनदार सुनील दादू कोकळे, मुख्य सल्लागार जयेश ढेबे, सल्लागार धाऊ केंडे, सचिव राजु आखाडे, ज्येष्ठ समाजसेवक जानू कोकळे, जानू कोकरे, संदीप ढेबे यांच्यासह संस्थेचे सर्व आजी माजी पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान, खासदार तटकरे यांच्या हस्ते करण्यात आला. धनगर समाजाच्या विकासासाठी उभारले जाणारे हे समाजभवन एकतेचे व प्रगतीचे प्रतीक ठरणार असल्याची भावना यावेळी सर्वांनी व्यक्त केली.



**माणगाव : येथील उद्योजक तथा तालुका पत्रकार संघाचे ज्येष्ठ सल्लागार विजय मेथा यांना वाढदिवसानिमित्त पत्रकार कमलाकर होवाळ, मजीद हाजीते, सलीम शेख यांनी शुभेच्छा दिल्या.**

**माणगाव : मस्जिद मोहल्ला येथे रमजान ईदनिमित्त सर्व समाज बांधवांना रुमान जमादार, शुएब जमादार, तौसिफ सय्यद, शकील, सज्ञाद शेख यांच्या हस्ते सरबत वाटप केले.**



# माथेरानमध्ये पारंपरिकतेचे घडले दर्शन

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान शहरात गुढीपाडवा सण उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामस्थ उत्सव मंडळाच्या वतीने दर वर्षी वसंतोत्सवाचे आयोजन करण्यात येते. मराठी नव वर्षाचा पहिला सण गुडी पाडवा पासून वसंतोत्सवाला सुरुवात होते. गुढीपाडवा ते श्रीराम नवमी असा संपूर्ण वसंतोत्सवाचा कार्यक्रम माथेरान ग्रामस्थ उत्सव मंडळ यांच्या वतीने साजरा केला जाणार आहे.

या वसंतोत्सवाची सुरुवात गुढीपाडवा सणापासून झाली. मुख्य बाजार पेठेतील श्रीराम मंदिरात पहाटे ५ वा.काकड आरती पासून सुरवात झाली.त्यानंतर दर वर्षीप्रमाणे श्रीराम मंदिर पटांगणात ग्रामस्थ उत्सव मंडळाच्या वतीने जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते.या कुस्त्या निमित्त अनेक पैलवान कुस्त्या खेळण्यासाठी माथेरानला आले होते, महाराष्ट्रातील विविध भागातून हे कुस्ती वीर आले होते. लहान मुलांच्या कुस्त्यांपासून स्पर्धेला सुरवात झाली. नंतर सायंकाळी मोठ्या कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले.



दरवर्षी प्रमाणे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, कुलदीप जाधव आणि किरण जाधव यांचे या स्पर्धेला मोठे आर्थिक पाठबळ मिळाले आणि ही कुस्ती स्पर्धा यशस्वी झाली.मान्यवरानां ग्रामस्थ उत्सव मंडळाच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला कुस्त्या पाहण्यासाठी आवर्जून माथेरान पोलीस निरीक्षक सरिता मुसळे व माजी नगरसेवक रघुनाथ कदम,माजी भाजपा अध्यक्ष अरविंद शेलार उपस्थित होते.

ग्रामस्थ उत्सव मंडळाच्या वतीने यांचा देखील शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.पैलवान कुस्त्या खेळताना आपले डाव दाखवून,प्रेक्षकांची दाद घेत होते. कुस्ती जिंकल्या नंतर विजयी पैलवानाला रोख रक्कम देऊन गौरविण्यात येत होते. पंच म्हणून गिरीश पवार, मंगेश मोरे, अनिल नाईकडे यांनी काम पहिले. ग्रामस्थ उत्सव मंडळ दरवर्षी कुस्त्याप्रमाणे, राम नवमी, हनुमान जयंती देखील मोठया उत्साहात साजरी करतात. या करिता मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सुतार, मराठा समाज अध्यक्ष चंद्रकांत जाधव, अंनत शेलार, मुकेश तोरणे, नरेश शिंदे, व अनेक कार्यकर्ते मेहनत घेत असतात.

# खोपोलीत स्वामी समर्थ स्तोत्र पुस्तिकेचे प्रकाशन

**खोपोली : प्रतिनिधी**

येथील कोमसाप शाखा खोपोलीचे अध्यक्ष व श्री स्वामी समर्थ भक्त प्रकाश राजोपाध्ये यांनी लिहिलेल्या श्री बावन्न श्लोकी श्री स्वामी समर्थ स्त्रोत्र या छोट्या पुस्तिकेचे प्रकाशन श्री स्वामी समर्थांच्या प्रकटदिनी खोपोलीतील श्री स्वामी समर्थ मंदिर भानवज येथे सुधागड पालीचे तहसीलदार उत्तम कुंभार साहेब यांचे हस्ते करण्यात आले.



यावेळी जेष्ठ कवियित्री उज्ज्वला दिघे, कै.र.वा.दिघे यांचे सुपुत्र वामनराव दिघे, पत्रकार, संजय पाटील, कोमसाप सदस्या मधुमिता पाटील, श्री स्वामी समर्थ मंदिरचे अध्यक्ष सुधीर तेंडुलकर, उपाध्यक्ष श्सजय गुरव, रागाज् म्युझिकल्स् बारामती यांचे संचालक अरविंद देशपांडे, सौ.राजोपाध्ये, सौ.कुंभार, श्री हेमंत व मयुरेश राजोपाध्ये व अनेक श्री स्वामी समर्थांचे भक्त उपस्थित होते. श्री राजोपाध्ये यांचे श्री स्वामी समर्थांचेवरचे हे चौथे पुस्तक आहे.

# आज शिवसेना कार्यकर्ता बैठक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना बेलापूर विधानसभा क्षेत्रातील शिवसेना पक्षाच्या प्रमुख पदाधिकारी आणि पदाधिकारी यांची महत्वपूर्ण बैठक रविवारी २२ मार्च रोजी दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

शिवसेना पक्षाचे पुढील धोरणात्मक निर्णय, पक्षांची वाटचाल आदीबाबत शिवसेना उपनेते विजय नाहटा, नवी मुंबई मनपा विरोधी पक्षनेते विजय चौगुले मार्गदर्शन करणार आहेत. तरी बेलापूर विधान सभा क्षेत्रातील प्रमुख पदाधिकारी, नगरसेवक, माजी नगरसेवक, महिला, युवासेना, शिवसेनेच्या सर्व आघाड्यांचे पदाधिकारी यांनी बैठकीसाठी उपस्थित रहावे, असे शिवसेना नवी मुंबई जिल्हा प्रमुख बेलापूर विधान सभा क्षेत्र किशोर पाटकर यांनी कळविले आहे.

# सखी मंगळागौरच्या सदस्यांनी नवीन पनवेलच्या शोभायात्रेत उमटवला ठसा

**पनवेल : वार्ताहर**

गेल्या अनेक वर्षांपासून सखी मंगळागौर पनवेलच्या माध्यमातून विविध उपक्रमात सहभाग घेऊन ते आपल्या कार्याचा ठसा उमटवत असतात व भरघोष बक्षीस जिंकत असतात. अश्याच प्रकारे नवीन पनवेल येथे आयोजित नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांच्या निघालेल्या पाडव्याच्या शोभायात्रेतसुद्धा सतत ९व्या वर्षी सखी मंगळागौर पनवेल यांनी सहभाग घेऊन आपला ठसा उमटवला.

यावेळी त्या सदस्यांनी सदस्यांनी वेगवेगळी थिम सादर करून नवीन पनवेलकरांची मने जिंकली. यापूर्वी सुद्धा त्यांनी सैनिक, औषधी वनस्पती, कोळी बांधवाच राहणीमान, खाद्य, वेशभुषा, व्यवसाय, वारकरी, कोकणातले खेळे, साडेतिन शक्तीपिठ असे विविध थिम सादर केली आहेत. त्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणात रोख बक्षिसे पात्र केली आहेत.

# प्रा.चंद्रकांत मढवी यांचा होणार सन्मान

**कळंबोली : बातमीदार**

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वाटचालीत योगदान दिल्याबद्दल कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.चंद्रकांत मढवी यांचा मालगुंड, रत्नागिरी येथे सन्मान होणार आहे.

मागील गेली अनेक वर्ष मराठी भाषा, मराठी साहित्य आणि साहित्य चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी कार्य करणाऱ्या कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वाटचालीत प्रा.चंद्रकांत मढवी यांनी अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. प्रा.चंद्रकांत मढवी यांच्या योगदानाची दखल घेऊन कोकण मराठी साहित्य परिषदेच्यावतीने कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या उपस्थितीत होणाऱ्या सन्मान सोहळा कार्यक्रमात प्रा.चंद्रकांत मढवी यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

मंगळवार, २४ मार्च २०२६ रोजी रत्नागिरीच्या कवी केशवसुत स्मारक मालगुंड येथे सकाळी १० वाजता हा सन्मान सोहळा होणार आहे. कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे संस्थापक अध्यक्ष असलेले प्रा.चंद्रकांत मढवी यांच्या उधल्या, बाजार या कादंबरी प्रकाशित झाल्या आहेत त्याचप्रमाणे अग्रायन कथासंग्रह आणि प्रहार कविता संग्रह प्रकाशित झाला आहे तर उत्कृष्ट कादंबरी म्हणून उधल्या कादंबरीला कोकण मराठी साहित्य परिषदेचा उत्कृष्ट कादंबरी म्हणून पुरस्कार मिळाला आहे.

# अभ्यासक्रम समावेशासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संविधानाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चौदार तळ्यावर केलेल्या सामाजिक क्रांतीची तुलना फ्रेंच राज्यक्रांतीशी केली जाते. त्या महाड क्रांतीचा इतिहास विद्यालय, महाविद्यालय आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यासाठी गाढे अभ्यासक असलेल्या तज्ज्ञांची एक राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

या समितीच्या स्थापनेची घोषणा शुक्रवारी सुरू झालेल्या महाड क्रांती शताब्दी महोत्सवानिमित्त 'समान संधी अभियान' चे अध्यक्ष सुनील कदम यांनी एका पत्रकाद्वारे केली आहे. अभ्यासक्रमात समावेशासाठी महाड क्रांतीच्या इतिहासावर आधारित धड्यांचे स्वरूप ही तज्ज्ञांची समिती निश्चित करणार आहे, असे त्यांनी सांगितले.

डॉ.प्रल्हाद जोगदंड हे या अभ्यासक्रम तज्ज्ञ समितीचे अध्यक्ष असून प्रा. राजेश सोनावणे हे समन्वयक आहेत. या समितीमध्ये एकूण १७ अभ्यासकांचा समावेश आहे. त्यात डॉ. मृदुल निळे, डॉ. सुंदर राजदीप, डॉ.अविनाश कोल्हे, डॉ.कृष्णा गायकवाड, डॉ. सुवर्णा जाधव, डॉ. प्रदीप वाघमारे, प्रा अतुल रणपिसे, प्रा. सुहास चव्हाण (मुंबई), प्रा. विजय मोहिते (कोकण), डॉ. सुनील नरवडे (मराठवाडा), डॉ विद्या चोरपगार, डॉ चेतना सवाई, डॉ. गौतम कांबळे, डॉ सुधीर जिंदे (विदर्भ) सदस्यांचा समावेश आहे, अशी माहिती कदम यांनी पत्रकात दिली आहे.


मुंबई मराठी पत्रकार संघ आणि समान संधी अभियान यांचा महाड क्रांती शताब्दीचा प्रारंभिक समारंभ गेल्या आठवड्यात पत्रकार भवनात पार पडला होता. त्यातून महाड क्रांतीचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची मागणी पुढे आली आहे. या मागणीला अनेक संस्था - संघटनांनी पाठींबा यापूर्वीच जाहीर केला आहे.

**दुखवटा**

# धोंडीराम देशमुख

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील मैत्रीपार्क येथील रहिवाशी तथा उपकृषी अधिकारी तालुका फलरोप वाटिका रेपोली तालुका माणगावचे प्रमोद धोंडीराम देशमुख यांचे पिताश्री धोंडीराम (आण्णा) विठल देशमुख (वय ७९) यांचे मंगळवारी (दि.१७) माणगाव मैत्रीपार्क येथे निधन झाले. त्यांच्या पश्च्यात पत्नी, एक भाऊ, एक बहीण, दोन मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



कै.धोंडीराम (आण्णा) देशमुख यांचे मुळगाव महाड तालुक्यातील वरंध असून नंतरच्या काळात ते माणगाववासी झाले. कै. देशमुख यांचा दशक्रिया विधी गुरुवार, २६ मार्च रोजी तर उत्तरकार्य विधी तेरावे रविवार, २९ मार्च २०२६ रोजी मूळगावी वरंध येथे होणार असल्याची माहिती त्यांचे सुपुत्र प्रमोद देशमुख यांनी दिली.

## निवडक

### कारच्या धडकेत ज्येष्ठाचा मृत्यू

**पनवेल :** रस्ता ओलांडणाऱ्या ६३ वर्षीय शिवाजी जबाजी खंदारे यांना होंडा सिटी मोटर कारने धडक दिली. या धडकेत त्यांचा मृत्यू झाला. या अपघातप्रकरणी कार (एमएच १२ एमबी ०१३६) वरील चालक अमर सईद सय्यद (रवी बाजारपेठ, लक्ष्मी रोड, पुणे) याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शिवाजी खंदारे (रा. मालधक्का, पनवेल रेल्वे स्टेशन) हे संध्याकाळी ७ वाजता जेएनपीटी हायवेवर कंटेनरला रस्ता दाखवण्याचे काम करण्यासाठी गेले होते. रात्री पावणेदहाच्या सुमारास ते जेएनपीटी हायवेवर जेएनपीटीकडून पळस्पेकडे जाणाऱ्या लेनवर निलेश धाब्यासमोर रस्ता क्रॉस करत होते. यावेळी भरधाव वेगाने आलेल्या होंडा सिटी कारने त्यांना धडक दिली. या धडकेत ते जखमी झाले आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला.

### हद्दपार आरोपीविरोधात गुन्हा

**पनवेल :** दोन वर्षांकरिता हद्दपार केलेल्या आरोपी कळंबोली परिसरात सापडून आल्याने ऋतिक रवींद्र पगारे (वय २१ रा. सेक्टर ४ कळंबोली) याच्याविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ऋतिक पगारे याला नवी मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले आहे, मात्र हद्दपार केलेला असतानाही तो घरासमोरील गार्डनमध्ये बसलेला दिसून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

### श्रीराम जन्मोत्सव सोहळा

**पनवेल :** श्री राम मंदिर, शिवणसई-आंबे येथे २६ मार्च रोजी श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी श्रींची पूजा आणि अभिषेक तसेच कीर्तन, महाप्रसाद, भजन, पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी नरेश कुमार अग्रवाल, अभिनेते अतुल अग्निहोत्री, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### रोजगार मेळावा उत्साहात

**पनवेल :** दिनेश मांडवकर आणि विश्वास पाटील यांच्या माध्यमातून विद्याधर चोरघे यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने रोजगार मेळाव्याचे आणि शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयटीआय, फिटर, इलेक्ट्रिशन, प्लांट मशीन ऑपरेटर, लॅब असिस्टंट या पदासाठी अनेक युवक युवती यांनी रोजगार मेळाव्याचा फायदा घेतला. यावेळी नगरसेवक रामदास शेवाळे, दुंदरेचे सरपंच सुभाष भोपी, माजी सरपंच भारत भोपी, माजी उपसरपंच धनंजय पाटील आदी उपस्थित होते.

### बैठक हॉलची आकर्षक सजावट

**मोहोपाडा :** हिंदू नववर्ष गुढीपाडव्यानिमित्त मोहोपाडा येथील श्री समर्थ बैठक हॉलची दासभक्तांनी आकर्षक सजावट केल्याने दासभक्तांसह पाहणाऱ्यांचे आकर्षण ठरले आहे. बैठक हॉलसमोरुन ये जा करणारे नागरिक श्री समर्थांचे दर्शन घेऊन आकर्षक रेखाटलेली रांगोळी पाहून भारावून जात असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. श्री स्थापने भोवताली फुलांची सजावट तसेच थोर निरुपणकार डॉ. नानासाहेब धर्माधिकारी तसेच डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रतिमेला केलेली सजावट आकर्षण ठरत आहे.



# हॉटेलमध्ये शिरून तलवारीने वार करणाऱ्याला अटक

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे उपनगरातील हॉटेल चालकाकडून महिन्याला पाच हजार रूपयांचा हफ्ता देण्यावरून झालेल्या वादानंतर हॉटेलच्या व्यवस्थापकावर तलवारीने केलेल्या हल्यातील संशयीत आरोपीला कामोठे पोलिसांनी कळंबोली येथून अटक केली आहे. आशिष घोडके उर्फ आशाभाय असे त्याचे नाव आहे. अजून तीन दिवस अशोकला पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. अशोकवर यापूर्वीसुद्धा मारहाणीचे भांडुप व



कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हे नोंद आहेत.

३० वर्षांचा अशोक हा मूळचा सांगली येथील राहणारा असून त्याला यापूर्वी भांडूपच्या एका गुन्ह्यात अटक झाल्यानंतर तो मुंबईच्या कारागृहात अनेक महिने राहीला. त्यानंतर तो कामोठे येथील सेक्टर ३५ मध्ये कुटूंबासोबत राहू लागला. प्रवासी वाहतूकीचा व्यवसाय करण्यासाठी त्याने स्वताची मोटार खरेदी करून तो मोटार चालक म्हणून व्यवसात करत होता. या दरम्यान कळंबोली पोलीस ठाण्यात २०१८ मध्ये अशोकवर अजून एक मारहाणीचा गुन्हा दाखल झाला.

१६ मार्चच्या मध्यरात्री मित्रांसोबत अशोक कामोठे येथील सेक्टर ६ ए मधील सरोवर बारमध्ये दारू व जेवणाचे पार्सल घेण्यासाठी गेल्यावर त्याने हॉटेल व्यवस्थापकाला बाहेरून आलेल्या व्यक्ती धंदा करताय, महिन्याला पाच हजार रूपयांचा हफ्त्याची मागणी केली. यामुळे हॉटेल व्यवस्थापक आणि अशोक व त्याचे अन्य मित्रांसोबत वाद झाला. हॉटेल व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांनी अशोक व त्याच्या मित्रांना पिटाळून लावले, मात्र याच वादाचा राग मनात धरून अशोकने दूसऱ्या दिवशी १७ मार्चला तलवार घेऊन हॉटेल व्यवस्थापक उमेश शेट्टीला मारहाण केली.

या मारहाणीचे चित्रिकरण हॉटेलमधील सीसीटिव्ही कॅमेरात झाल्यानंतर व्यापाऱ्यांमध्ये भिती निर्माण झाली. तातडीने या घटनेची गंभीर दखल घेत सहाय्यक पोलीस आयुक्त विक्रम कदम यांच्या सूचनेनंतर कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे, पोलीस निरीक्षक मनोहर पगार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश दळवी, पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह चव्हाण, पोलीस हवालदार संजय झोळ, पोलीस शिपाई प्रमोद कोकाटे, राजेंद्र इलग यांच्या पथकाने सपून बसलेल्या अशोकला कळंबोली येतील अग्निशमनदला शेजारील पुलाखालून पकडला. अद्याप अशोकने तलवार कोणाकडून खरेदी केली. याची माहिती पोलिसांनी दिली नाही.

## पाटील फिटनेस जिमचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देत 'पाटील फिटनेस (PF)' या अत्याधुनिक फिटनेस सेंटरच्या नव्या शाखेचे उद्घाटन डेरवली येथे गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर मोठ्या उत्साहात पार पडले. विष्णू वंदन रेसिडेन्सी येथे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते फीत कापून आणि आतिषबाजीच्या जल्लोषात या सेंटरचे लोकार्पण करण्यात आले.



या सोहळ्यास नगरसेवक गणेश कडू, सुनील बहिरा, श्रुती डेव्हलपर्सचे लक्ष्मण भाटेशरा, जगदीश पवार, भाजप पदाधिकारी अतुल म्हात्रे, गोरखनाथ धुमाळ तसेच अनेक आजी-माजी लोकप्रतिनिधी, स्थानिक ग्रामस्थ आणि फिटनेस क्षेत्रातील तज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'पाटील फिटनेस (PF)' मध्ये आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित व्यायाम उपकरणे, प्रशिक्षित मार्गदर्शक, सुरक्षित व प्रशस्त वातावरण आणि आरोग्याला प्रोत्साहन देणाऱ्या विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे हे सेंटर परिसरातील नागरिकांसाठी तंदुरुस्तीचे नवे केंद्र ठरणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## किरकोळ वादावरून एकाला मारहाण

**पनवेल : वार्ताहर**

ऑफिसमध्ये झालेल्या किरकोळ वादावरून एकाला बांबू आणि पेवर ब्लॉकच्या सहाय्याने मारहाण केल्याप्रकरणी अविनाश गुरुनाथ राठोड (कुकशेत, नेरूळ) रितेश गुरुनाथ राठोड (नेरूळ), अंश समीर हांडे (सेक्टर १९, उलवे) यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. योगेंद्र चौधरी (वय ३०) हा खारघर सेक्टर १२ येथे राहत असून त्यांच्या कंपनीत रोहन चव्हाण अविनाश राठोड हे काम करतात. रोहन चव्हाण हा व्हॅगनार कारने जात होता. यावेळी ऋतुराज तिवारी हा गाडीत होता. अविनाश राठोड हा त्याचा भाऊ रितेश राठोड चालवत असलेल्या बुलेटवर मागे बसला. अंश हांडे हा दुसरी दुचाकी चालवत होता. त्यावेळी रोहन चव्हाण याच्या चार चाकी गाडीला खुटारी गावच्या

**तीन जणांवर गुन्हा दाखल**

कमानीच्या समोरील रस्त्यावर ओव्हरटेक करून रोहनची गाडी थांबवण्यात आली.

अविनाश याने रोहन याला ऑफिसमध्ये झालेल्या किरकोळ वादावरून बाहेर खेचले आणि बांबू आणि पेवर ब्लॉकच्या साहाय्याने मारहाण केली. त्या मारहाणीत रोहन गंभीर जखमी झाला. त्याला खारघर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## कळंबोली प्रभाग १०मधील नागरी समस्या सोडविण्यासाठी पाहणी दौरा करावा

### नगरसेवक रवींद्र भगत यांची महापौरांकडे मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली प्रभाग क्र.१० मधील विविध नागरी समस्या सोडविण्यासाठी महापौर नितीन पाटील व इतर अधिकार्यांनी पाहणी दौरा करण्याची मागणी नगरसेवक रवींद्र भगत यांनी महापौर नितीन पाटील यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी त्यांच्यासमवेत उपमहापौर प्रमिला पाटील व रविनाथ पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना नगरसेवक रवींद्र भगत यांनी सांगितले की, कळंबोली प्रभाग क्रमांक १० मधील पाणी प्रश्न, क्रीडांगण, होल्डिंग पॉंड, गार्डन, हॉकर झोन रस्ते पार्किंग नालेसफाई व इतर समस्या विकासकामे करण्याकरिता महापौर व संबंधित अधिकारी सहित कळंबोलीत पाहणी दौरा करणे आवश्यक आहे.

सुविधांचा अभाव असल्या कारणाने कळंबोलीतील नागरिकांना त्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तरी सदर सुसज्ज असा डेव्हलपमेंट होण्याच्या दृष्टीकोनातून महापौर नितीन पाटील यांनी कळंबोलीत दौरा करावा अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

## उरणमध्ये रमजान ईद उत्साहात

**उरण : वार्ताहर**

उरण पोलीस ठाणे हद्दीतील मुस्लीम बांधवांनी रमजान ईदनिमित्त शनिवार (दि. २१) रोजी नमाज अदा केली. जामा मज्जित उरण येथे पहिली नमाज ८ ते ८.२५ वाजेदरम्यान सुमारे ५००० ते ५५०० मुस्लीम बांधवांनी अदा केली. दुसरी नमाज ९ ते ०९.२० वा. १४०० ते १५०० बांधवांनी अदा केली.

दरसा मेहमुदिया खिडकोळी नाका उरण येथे पहिली नमाज ७.४५ ते ८.१० वा. १२०० ते १२५० मुस्लीम बांधवांनी अदा केली. दुसरी नमाज ८.३० ते ८.५५ वा.सुमारे ५०० ते ६०० बांधवांनी अदा केली. खाजा गरीब नवाज सुंनी हनफी मदरसा बालई रोड येथे पहिली नमाज ७.१५ ते ०७.४० वा. सुमारे १३०० ते १३५० बांधवांनी अदा केली. दुसरी नमाज ८ ते ०८.४५ वा.५५० ते ६०० बांधवांनी अदा केली. शंकर पीर दर्गा मदरसा करंजा रोड येथे पहिली नमाज ७.४५ ते ८.१० वा. ४०० ते ४५० बांधवांनी अदा केली. दुसरी नमाज ०८.३० ते ८.५५ वा. सुमारे २०० ते २५० बांधवांनी अदा केली. मज्जित व मदरसा या ठिकाणी नमाज पठण झाले.

सहाय्यक पोलीस आयुक्त (पोर्ट विभाग) किशोर गायके, उरण पोलीस ठाण्याचे निरीक्षक (गुन्हे) राहुल काटवाणी, उरण तालुका वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे आदींनी मुस्लिम बांधवांना गुलाबाचे फुल देऊन रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.



## प्रथमेश शिंदे युपीएससी परीक्षेत उत्तीर्ण

**उरण : रामप्रहर वृत्त**

घरची आर्थिक परिस्थिती गरिबीची असताना आपल्या परिस्थितीवर मात करून तु.ह. वाजेकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे मधून २०१७ साली दहावीची परीक्षा ९५.६ टक्के गुण मिळवून व २०१९ साली बारावीची परीक्षा उसके सुपा मिळवून तसेच फुंडे संकुलात विज्ञान शाखेची पदवीची परीक्षा ९.१ सीजीपीए गुण मिळवून घवघवीत यश मिळवल्यानंतर प्रथमेश दिलीप शिंदे या विद्याथ्यर्थ्याने सर्वात कठीण अशा युपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन यशाला गवसणी घातली.



सुरुवातीपासून अतिशय हुशार, नम्र, शांत व प्रामाणिक असलेला कुमार प्रथमेश दिलीप शिंदे याला आयपीएस किंवा आयआरएस या खात्यामध्ये नोकरीची संधी मिळाली आहे. वडील रिक्षा चालक व आई गृहिणी असताना देखील आपल्या परिस्थितीचे कारण कधीही समोर न करता आपल्या अभ्यासातील मेहनतीवर विश्वास ठेवून प्रथमेशने हे यश संपादन केले.

प्रथमेशने २०२२ साली फुंडे संकुलातून पदवी घेतल्यावर दिल्ली या ठिकाणी दीड वर्ष कोचिंग क्लासेस मधून यूपीएससी परीक्षेचा अभ्यास केला व त्यानंतर मुंबई येथे एक वर्ष वास्तव्यास राहून अभ्यास केला. आपल्या तिसऱ्या प्रयत्नातच २४ वर्षीय प्रथमेशने हे यश संपादन केल्याबद्दल निश्चितच आपल्या आई-वडिलांचे व आपण ज्या शाळेमध्ये शिक्षण घेतले त्या रयत शिक्षण संस्थेच्या तु. ह. वाजेकर विद्यालय फुंडे शाळेचे नाव उंचावले आहे.

या यशाबद्दल प्रथमेशने आई-वडिलांचे तसेच आपल्याला ज्ञानार्जन केलेल्या गुरुवर्यांचे आभार मानले. या यशाबद्दल विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन सदस्य विद्यालयाचे प्राचार्य महाराष्ट्र शासन आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते बी.बी.साळुंखे, उपमुख्याध्यापिका एस.डी. थोरात व पर्यवेक्षिका एस. एम.बाबर, एस.एस. पाटील तसेच सर्व शिक्षकवृंद व कर्मचारीवर्ग यांनी अभिनंदन केले.

## प्रशांत शेडगे यांना उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथे गेली अनेक वर्षे पत्रकारितेमध्ये वंचित घटकांना न्याय देण्याबरोबरच विविध सामाजिक विषय मार्गी लावणारे पनवेल महानगर प्रेस क्लबचे अध्यक्ष पत्रकार प्रशांत शेडगे यांना नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचा उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात आले.



नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोशियनचा १४वा वर्धापन दिन मोठया उत्सवात साजरा करण्यात आला. या वेळी कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार लोकनेते सुनील तटकरे यांची उपस्थिती होती. त्याचबरोबर नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोशिएशनचे अध्यक्ष अॅड.महेश पवार, संस्थापक श्यामकांत नेरपगार, सचिव अनिल पवार व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

पत्रकार प्रशांत शेडगे गेली २० वर्षे पत्रकारितेत सक्रिय असून त्यांनी आतापर्यंत अनेक नामांकित वृत्तपत्रात आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे.

यामुळे पत्रकार शेडगे यांना पनवेल गौरव पुरस्कार, पनवेल भूषण पुरस्कार, महाराष्ट्र एक्सेलन्स अवॉर्डबरोबरच अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यात आणखी उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार मिळाल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

## हनुमान मंदिराच्या जीर्णोद्धाराचे भूमिपूजन

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील श्री हनुमान मंदिराच्या जिर्णोद्धाराचे भूमिपूजन शनिवारी २१ मार्च रोजी विधिवत पूजनाने करण्यात आले.

चिरनेर गणपती देवस्थानातील हे कौलारू हनुमान मंदिर जीर्ण झाले होते. या मंदिरातील हनुमानाची मूर्ती ही भव्य पाषाणी व पुरातन आहे. गणपती तीर्थस्थानातील हनुमान मंदिराचा जिर्णोद्धार व्हावा हे ग्रामस्थांबरोबर भक्तगणांना वाटत होते. समीर पाटील यांनी मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी स्वखर्चातून या हनुमान मंदिरासह समोरील सभामंडप उभारण्याचा महत्त्वपूर्ण ग्रामस्थांच्या उपस्थितीत निर्णय घेतला. या मंदिराच्या उभारणीच्या संपूर्ण कामाची देखरेखग्रामस्थ, गणपती देवस्थान ट्रस्ट व गणपती उत्सव कमिटीच्या नेतृत्वाखाली केली जाणार आहे.




**उरण :** रमजान ईदनिमित्ताने नुरा शेख यांना कामगार नेते सुरेश पाटील, भाजप तालुका उपाध्यक्ष विशाल म्हात्रे, बीएमएच संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष राजन घरत, माजी प्राचार्य अरुण घाग, शिंदे सर, संतोष पाटील, राजेश कांबळे आदींनी शुभेच्छा दिल्या.



**पनवेल :** भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी रमजान ईदनिमित्त रहिम लदाप व त्यांच्या कुटुंबियांना शुभेच्छा दिल्या. यावेळी विश्वनाथ कोळी, सुभाष भगत, माजी उपसरपंच विजय घरत, माजी ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत आदी उपस्थित होते.

# सरके चुनर... हटाव मोहीम सफल



गाणं कोणतेही का असेना ते लिहिताना, स्वरबद्ध करताना, त्यावर संगीतसाज चढवताना, त्याचे चित्रीकरण करताना, त्यावरची नृत्य शैली ठरवताना, अगदी ते सेन्सॉर संमत होत असताना ते गाणे नेमके कसे आहे याची कल्पना असतेच, तरीदेखील अश्लील गाण्याचा जन्म होतोच कसा? गीतकार डोळे मिटून तर गाणं लिहित नाही, गायक न वाचताच गात नाहीत, संगीतकार उगाच चाल लावत नाही, कलाकार गाणं न ऐकताच कॅमेरासमोर नाचत नाहीत. तरी तोल सुटतोच कसा? बरं तो किती सुटावा याचं काही ताळतंत्र?

ताजं उदाहरण, 'के डी द डेव्हिल' या चित्रपटातील सरके चुनर या वादग्रस्त गाण्याचे! रकीब आलम यांनी लिहिलेल्या या गीताला अर्जुन जन्या याचं संगीत आहे आणि हे गीत मंगली हिने गायले आहे आणि संजय दत्त आणि नोरा फतेही यांनी त्यावर वाह्यात अंगविक्षेप करणारे नृत्य केले आहे. आता ते म्हणतील, आम्ही नृत्य दिग्दर्शकाला फॉलो केले, पण मुळात गाणं लिहिताना गीतकाराचा हेतूच जर किळसवाणा असेल तर? यू ट्यूबवर असे काहीही पाहिले नि ऐकलं जाते या भ्रामक कल्पनेतून हे सगळे घडलं बिघडलं आणि त्यावर सोशल मीडियावर अशी काही सडकून टीका झाली की हे गाणे हटवल्याशिवाय काही पर्यायच नव्हता. आता म्हणे, मूळ कन्नड चित्रपटातील गाण्याचे हे भाषांतर केले आहे. मूळ गाणेही असं अचकट विचकट, अश्लील बिभत्स असेल तर तेही आक्षेपार्ह, निंदनीय आहे आणि मूळ गाणं हिंदीत आणताना आपण काय करतोय हे गीतकार, संगीतकार, गायक, नृत्य दिग्दर्शक, कलाकार यांना त्याहूनही समजत नसेल तर त्यांच्याकडे सामाजिक सांस्कृतिक माध्यम यांचे भान नाही. एक प्रकारची बेपर्वा वृत्ती त्यांच्यात आहे हे यातून अधोरेखित होत आहे.

अशा अश्लील चाळे करणाऱ्या कलाकारांना भरभक्कम मानधन महत्त्वाचे वाटते की काय? भरभक्कम मानधन मिळते म्हणून आपलं चित्रीकरण लवकर संपवून उंची सलून आणि ब्युटी पार्लर असो, फूड पॉईट असो यांच्या रिबिनी कापण्यात आज बरेचसे सेलिब्रिटीज (सर्व नाहीत) रस घेतात याच कर्तव्याची सोशल मीडियात पोस्ट शेअर करण्याचं वेगळे मानधन घेतात अशा व्यावहारिक वातावरणात आपण नृत्य करीत असलेले गाणे वाह्यात आहे याचं कदाचित भान सुटत असेलही. पैसे मिळताहेत म्हणून आपण कसेही नाचलो तरी चालेल असा त्यांचा भ्रम असावा. सोशल मीडियाच्या युगात तसा भ्रम अनेकांचा झाला आहे.

अशा गीत संगीताचीही चक्क एक फिल्मी परंपरा आहे. नव्वदच्या दशकात अशाच गाण्यांवरुन बरेच वादंग निर्माण झाले. सुभाष घई निर्मित व दिग्दर्शित खलनायक(१९९३)च्या गाण्याची ध्वनिमुद्रिका, ध्वनीफित प्रकाशित झाली आणि चोली के पीछे क्या है गाण्याचे वादळ निर्माण झाले. आनंद बक्षी लिखित या गाण्याला लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत आहे. इला अरुणने ठसकेबाजपणे गायलंय. गाण्याचा मुखडा वाह्यात आहे असे टीकाकारांचे म्हणणं होतं. त्या काळात अगोदर ऑडिओ कॅसेट आपल्यापर्यंत येत असे आणि त्यामुळे पडद्यावर हे गाणे कसे दाखवले आहे याची कल्पना येत नसे. आपल्या देशात उपग्रह वाहिन्यांची ती सुरुवात होती. सुभाष घईच्या वतीने सांगण्यात येत असे की, हे उत्तर भारतातील लोकगीत संगीत नृत्य आहे. ते या चित्रपटात प्रासंगिक आहे. तेथील संस्कृतीनुसार त्यात वाह्यात असे काही नाही. चित्रपटात ते वापरले गेल्याने ते वाह्यात वाटते. प्रसारमाध्यमातून यावर बरेच काही लिहिले गेले. चित्रपट संगीत क्षेत्रातील अनेकांनी आपापली मते व्यक्त केली. या उलटसुलट गदारोळात या चित्रपटाच्या ध्वनीफितीची अक्षरशः प्रचंड विक्री वाढली. सिल्व्हर डिस्क झाली, गोल्डन डिस्कही झाली, प्लॅटीनम डिस्क झाली.... आणि असे करत करत 'खलनायक' प्रदर्शित झाला आणि पडद्यावर चोली के पीछे क्या है दिसले. नृत्य दिग्दर्शिका सरोज खान यांनी माधुरी दीक्षितला दिलेल्या स्टेप्स कुठेही वाह्यात नव्हत्या. अन्यथा सेन्सॉरची कैची होतीच. याच गाण्यात संजय दत्तही आहे आणि त्याच्या मनोरंजनासाठी हे गीत संगीत नृत्याची बहारदार फोडणी आहे. अर्थात, ही सगळी पटकथेची मागणी.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

याच बहुचर्चित चित्रपटासह सावनकुमार निर्मित आणि दिग्दर्शित 'खलनायिका'ही आला. त्यात याच गाण्याशी स्पर्धा करणारे चोली मे है तबाही तबाही हे होळी गीत. वर्षा उसगावकरने जितेंद्रसोबत या गाण्यात छान रंग भरला.


याच काळात आणखी काही गाणी वादग्रस्त ठरली. आँखें चित्रपटातील सरकायलो खटीया जाडा लागे (गोविंदा आणि शिल्पा शिरोडकर) हे ग्रामीण संस्कृतीतील गाणेही फार फार गाजलं. पार्थो घोष दिग्दर्शित 'दलाल' या चित्रपटातील चढ गया उपर रे हे गाणे देखील लोकगीत संगीत नृत्यावर आधारित असल्याचे म्हटले गेले. दुलारा या चित्रपटातील गोविंदा आणि करिश्मा कपूर यांच्यावरील तेरी पॅन्ट भी सेक्सी गाण्यावरही बरीच उलटसुलट टीका झाली. गाण्यात सेक्सी हा शब्द आला तर त्यात इतकं बिघडलं काय असंही म्हणणारा एक वर्ग होताच. नव्वदच्या दशकात आपल्या देशात जागतिकीकरण आणि खुली अर्थव्यवस्था आली, त्यात नवीन पिढीला नवीन जगाची ओळख होतेय त्यात सेक्सी हा शब्द स्तुती म्हणून वापरला जातो असे म्हटले गेले. म्हणून तर 'खुद्दार' या चित्रपटातील करिश्मा कपूरवरचे हाय सेक्सी हॅलो सेक्सी लोग बोले हे गाणे लोकप्रिय ठरले. हिंदी चित्रपट संगीताचा हा उतरता काळ मानला जातो.

केदार शिंदे दिग्दर्शित 'जत्रा' या चित्रपटातील कोंबडी पळाली या आजही लोकप्रिय असलेल्या गाण्याला संगीतकार अजय अतुल यांनी 'अग्निपथ' या चित्रपटात चिकनी चमेली असे करत हिंदी चित्रपटात नेले. त्यावरचे कैतरिना कैफचे नृत्य वाह्यातच आहे. तिचा एकूणच अंगविक्षेप बिभत्स आहे. तरीही सेन्सॉरने त्यावर कैची का चालवू नये? कैतरिना कैफ फक्त आणि फक्त एक ग्लॅमरस डॉल आहे. नृत्यासाठी ती ओळखली जात नाही. तरीही तिला या नृत्यासाठी निवडले आणि एकदम भडक असे नृत्य पडद्यावर आले... आपण नृत्य करताना आपल्या शरीराला कसे विचित्र पद्धतीने नाचवतोय हे खुद्द कैतरिना कैफला समजू नये? की सुपर डुपर हिट गाण्याची संधी मिळाली आहे या आनंदात ती हे विसरली?

आपण नृत्य करताना गाण्याचे बोल ऐकायला हवेत ही पहिली सावधानता आणि नृत्य दिग्दर्शकाने दिलेली स्टेप ही पुढची महत्त्वाची पायरी. ते होत नाही म्हणून तर सरके चुनर यासारखे प्रकार होतात. आणि त्याला आवरा, त्यावर वेळीच बंदी घालण्यात यावी अशी मागणी होते. चित्रपटाला सेन्सॉर नको असे म्हणणारा एक वर्ग चित्रपटसृष्टीत आहे, ते सेन्सॉर नसेल तर गीत संगीत नृत्यात काय काय दाखवतील याचा काहीच नसेल हे नक्कीच, कारण मनोरंजन क्षेत्रात काहीना सवंग प्रसिद्धी हवी असेल तर? तोच तर मोठाच प्रश्न आहे. अधूनमधून अशी वाह्यात, बिभत्स गीत संगीत नृत्याची निर्मिती होते आणि वाद निर्माण होतोय... संस्कृतीरक्षक आहेत म्हणून या सगळ्याला चाप लागतोय.

# डोक्यावरचा हंडा काढा; पाणीपुरवठ्याचे नियोजन करा

## (२२ मार्च : जागतिक जल दिवस)

स्वयंपाकापासून ते सांडपाण्यापर्यंत घरात पाणी आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी भारतातील पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पिढ्यानऋपिढ्या महिलांनी सांभाळली आहे. आजही अनेकांना आपली आई, बहीण किंवा आजी डोक्यावर हंडा, कळशी किंवा घागर घेऊन लांबवरून पाणी आणतानाचे प्रसंग आठवते. भारतात आता हे चित्र कालबाह्य झाले तरी जगभरात अधिकही अनेक देशात नागरिक शुद्ध व नियमित पाणीपुरवठ्यापासून वंचित आहेत. त्यामुळे यंदा २२ मार्चला जागतिक जल दिवस साजरा करताना संयुक्त राष्ट्राने पाणी व्यवस्थापनात महिला सक्षमीकरणाला प्राधान्य दिले आहे.

भारताने पेयजलाच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे.घराघरांत नळाद्वारे पाणी पोहचवण्यासाठी जलजीवन मिशन प्रभावीपणे राबविण्यात आले. तरीही काही भागांत पाणीटंचाई कायम आहे आणि त्याचा सर्वाधिक भार महिलांवरच पडतो. ही समस्या केवळ भारतापुरती मर्यादित नसून जागतिक पातळीवरही ती तितकीच गंभीर आहे. म्हणूनच यंदाचा जागतिक जल दिवस पाणी आणि महिला सक्षमीकरण या व्यापक संकल्पनेशी जोडून साजरा केला जात आहे.

**जलसंकट : असमानतेचा प्रश्न**

पृथ्वीवरील सुमारे ७१ टक्के भाग पाण्याने व्यापलेला असला, तरी त्यातील केवळ २.५ टक्के पाणी गोड आहे. त्यातीलही अत्यल्प भाग मानवाच्या वापरासाठी उपलब्ध आहे. त्यामुळे पाण्याची विपुलता ही केवळ भास आहे. हवामान बदल, लोकसंख्यावाढ,औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यामुळे पाण्याची मागणी वाढत असताना उपलब्धतेत आणि वितरणात मोठी असमानता निर्माण झाली आहे. या असमानतेचा सर्वाधिक फटका स्त्रिया आणि मुलींना बसतो.

**पाणीटंचाईत महिलांचे सर्वाधिक शोषण**

संयुक्त राष्ट्रांच्या अहवालांनुसार जगभरातील एक अब्जाहून अधिक स्त्रिया अजूनही सुरक्षित पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत. सुमारे १.८ अब्ज लोकांच्या घराजवळ पाणी उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत प्रत्येक तीन घरांपैकी दोन घरांमध्ये पाणी आणण्याची जबाबदारी महिलांवर असते. ५३ देशांतील आकडेवारीनुसार स्त्रिया आणि मुली दररोज एकत्रितपणे सुमारे २५० दशलक्ष तास पाणी आणण्यात खर्च करतात. ही वेळ शिक्षण, रोजगार किंवा वैयक्तिक विकासासाठी वापरता आली असती.

अशुद्ध पाणी आणि स्वच्छतेच्या अभावामुळे दररोज सुमारे एक हजार बालकांचा मृत्यू होतो. याशिवाय जगातील सुमारे १४ टक्के देशांमध्ये पाणी व्यवस्थापनाच्या निर्णयप्रक्रियेत महिलांचा समान सहभाग निश्चित करणारी ठोस यंत्रणा नाही. हे आकडे स्पष्ट करतात की जलसंकट हा केवळ नैसर्गिक प्रश्न नसून तो सामाजिक, आर्थिक आणि लिंगभेद करणारा आहे.

**महिला जलव्यवस्थापनाच्या केंद्रस्थानी हव्यात**

भारतीय संविधानामुळे स्त्री-पुरुष समानतेचा पाया मजबूत झाला आहे.आज महिला उद्योग, शिक्षण, आरोग्य अशा अनेक क्षेत्रांत नेतृत्व करत आहेत. पाणी व्यवस्थापनातही त्यांचा अनुभव अमूल्य आहे, मात्र ही स्त्री समानता आत्ता जलव्यवस्थापनातही आणणे केवळ आपल्याच देशाची नाही तर जगभराची गरज बनली आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या मते, जलव्यवस्थापनात महिलांचा सहभाग वाढल्यास सेवा अधिक शाश्वत, समावेशक आणि प्रभावी ठरतात. त्यामुळे महिलांना 'पाणी आणणाऱ्या भूमिकेतून 'पाणी नियोजन करणाऱ्या भूमिकेत आणणे आवश्यक आहे.

**पाणी आणि अर्थव्यवस्था : अदृश्य नाते**

पाणी हे जीवनाचेच नव्हे तर अर्थव्यवस्थेचेही मूलभूत साधन आहे. जगभरात उपलब्ध शुद्ध पाण्यापैकी सुमारे ७० टक्के पाणी शेतीसाठी वापरले जाते, तर उद्योग आणि ऊर्जा क्षेत्रालाही मोठ्या प्रमाणावर पाण्याची गरज असते.

ज्या देशांनी प्रभावी जलव्यवस्थापन केले, तेथे आर्थिक प्रगती वेगाने झाली. इस्त्रायलने ठिबक सिंचन, सिंगापूरने सांडपाण्याचा पुनर्वापर, नेदरलँडने पूर नियंत्रण आणि ऑस्ट्रेलियाने जलसंधारण धोरण यशस्वीपणे राबविले. ही उदाहरणे योग्य नियोजनाचे महत्त्व अधोरेखित करतात.

**जागतिक उपाययोजना : बदलाची दिशा**

पाण्याच्या समस्येवर उपाय म्हणून विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. समुद्राच्या खाऱ्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर (डिसॅलिनेशन), सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापर तसेच नदी पुनरुज्जीवन प्रकल्प यांवर भर दिला जात आहे.

महाराष्ट्रातील नागपूर येथे सांडपाण्याचा औद्योगिक वापर केला जातो, तर नवी मुंबईचे सांडपाणी व्यवस्थापन आदर्श मानले जाते. याशिवाय वृक्षारोपण आणि जलसंधारण हे पर्यावरणीय संतुलनासाठी अत्यावश्यक उपाय आहेत.

**पाणी अडवा – पाणी जिरवा : प्रभावी उपाय**

पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे ही जलसंधारणाची सर्वात प्रभावी पद्धत आहे. यामुळे भूजल पातळी वाढते, विहिरी जिवंत राहतात आणि शेतीसाठी पाणी उपलब्ध होते.

शहरी भागातही रेनवॉटर हार्वेस्टिंग अनिवार्य करणे आवश्यक आहे. शासनाने नव्या बांधकामांसाठी ही अट बंधनकारक केली आहे, ही सकारात्मक बाब आहे.

**भारतातील प्रयत्न : धोरण आणि अंमलबजावणी**

भारत सरकारने पाणी व्यवस्थापनासाठी विविध योजना राबवल्या आहेत... जल जीवन मिशन-प्रत्येक जल जीवन मिशन, अटल भूजल योजना, जलशक्ती अभियान, स्वच्छ भारत मिशन, महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना, मुख्यमंत्री जलसंधारण योजना, नमामि गंगे योजना अशा कितीतरी योजनांमधून केंद्र व राज्य शासन जनतेला शुद्ध पेयजल उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करत आहे.



**प्रत्येक नागरिकाची भूमिका**

शासन स्तरावर विविध योजना राबविण्यात येत असल्या तरी सामान्य नागरिकांनीही या मोहिमेत एक जबाबदार नागरिक म्हणून पुढे येणे गरजेचे आहे.पाणी वाचवण्याची सुरुवात शासनाकडून नव्हे, तर घरापासून होते. आपण काही सोपे उपाय अवलंबू शकतो.जसे की, नळ आणि पाईप गळती त्वरित दुरुस्त करणे, रेनवॉटर हार्वेस्टिंग करणे, सांडपाण्याचा पुनर्वापर, ठिबक सिंचनाचा वापर पाण्याचा अपव्यय टाळणे, वृक्षारोपण करणे, घरातील पाणी व्यवस्थापनात महिलांचा निर्णयाधिकार मान्य करणे, पाणी हा केवळ नैसर्गिक संसाधन नसून तो मानवी हक्क, सामाजिक न्याय आणि लिंगसमतेचा आधार आहे. जलसंकटाचा विचार करताना समतेचा दृष्टिकोन आवश्यक आहे. तसा विचार रुजवणे. यासोबतच घराघरात केवळ पाण्याच्या उपलब्धतेसाठी महिलांचे शोषण होणार नाही याची काळजी घेण्याचाही आजचा दिवस आहे. चला तर महिलांच्या डोक्यावरचा हंडा काढूया आणि जल जीवन मिशन, अटल भूजल योजना,जलशक्ती अभियान, स्वच्छ भारत मिशन, महाराष्ट्र ग्रामीण पाणीपुरवठा योजना, विविध जलसंधारण योजनेच्या माध्यमातून पाणीटंचाईमुक्त समाज निर्मितीसाठी पुढे येऊया..., कारण पाणी वाचवणे म्हणजेच समाजाचे भविष्य सुरक्षित करणे होय.

**-प्रवीण टाके,** उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर

# पटकथाकार मधुसूदन कालेलकर

मधुसूदन कालेलकर हे मराठी नाटककार, कथाकार, कवी, गीतकार आणि पटकथाकार होते. त्यांचा जन्म २२ मार्च १९२४ रोजी वेंगुर्ले येथे झाला. शालेय शिक्षण वेंगुर्ल्यात झाल्यावर ते मुंबईत आले. सुरुवातीस ते गिरगावात राहण्यास आले. तिथे गणेशोत्सवाच्या निमित्ताने त्यांनी त्यांचे पहिले नाटक लिहिले आणि आपल्या लिखाणाचा श्रीगणेशा केला.

राजा नेने यांच्या हाताखाली काम करून त्यांनी चित्रीकरण आणि पटकथालेखन यांचा अनुभव मिळविला. त्यानंतर फिल्मिस्तान या संस्थेत त्यांना सेवा करण्याची संधी मिळाली. त्यांची पटकथा असलेले एकाहून एक

दर्जेदार चित्रपट यशस्वी होऊ लागले आणि सिद्धहस्त पटकथालेखक म्हणून त्यांचा लौकिक झाला. एकामागोमाग एक असे त्यांचे ७५पेक्षा जास्त चित्रपट प्रदर्शित झाले. स्वातंत्र्यलढ्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी लिहिलेले 'उद्याचे जग' हे त्यांचे पहिले नाटक. त्यांची एकंदर तीसहून अधिक नाटकं प्रदर्शित झाली. त्यात त्यांनी अनेक विषय हाताळले आहेत. कौटुंबिक, गंभीर, विनोदी आणि सामाजिकही. त्यांची लोकप्रिय अशी नाटकं. सहज भाषा आणि पकड घेणारे संवाद त्यामुळे ही नाटके चित्ताकर्षक ठरली.

कालेलकरांनी एकूण २९ नाटके आणि मराठी व हिंदी मिळून १११ चित्रपटांसाठी लिखाण केले. त्यात त्यांनी कौटुंबिक, गंभीर, विनोदी, सामाजिक असे अनेक विषय हाताळले आहेत. त्यांचे काही प्रमुख हिंदी चित्रपट 'बात एक रात की,' 'ब्लफ मास्टर,' 'झुमरू,' 'फरार,' 'दुल्हन वही जो पिया मन भाये,' 'अखियों के झरोखों से,' 'गीत गाता चल,' इत्यादी होते. त्यांनी चार नाटकांची निर्मिती केली. अनेक नाटकांचे गुजराती भाषेत प्रयोग झाले, तर तीन ते चार नाटकांवर हिंदी व मराठीत चित्रपटही झाले आहेत.

'आम्ही जातो आमुच्या गावा', 'पाहू रे किती वाट', 'अपराध', 'जावई विकत घेणे आहे', 'अनोळखी', 'गुपचूप गुपचूप', हे त्यांचे चित्रपट आहेत. 'बाळा गाऊ कशी अंगाई' या चित्रपटातील निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला गं बाई, या आजतागायत अंगाई म्हणून घरांघरांत सुपरिचित असलेल्या गीतासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट गीत लेखनाचे पारितोषिक देण्यात आले. साहित्य हा त्यांचा आवडता विषय होता, तर नाटकाविषयी प्रेम होते. 'अखेर जमलं' या मराठी चित्रपटासाठी त्यांनी विनोदी कथा लिहिली आणि तो चित्रपट चांगलाच गाजला.

त्यांच्या 'अपराध मीच केला,' 'सागरा प्राण तळमळला' व 'शिकार' या नाटकांना महाराष्ट्र शासनाचे सर्वोत्कृष्ट साहित्यिक कलाकृतीचे पारितोषिक मिळाले. 'हा माझा मार्ग एकला' या त्यांनी लिहिलेल्या चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला आहे. महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवात त्यांना एकूण नऊ वेळा सर्वोत्तम कथा, पटकथा व संवाद यांसाठी पुरस्कार मिळाला आहे. या व्यतिरिक्त त्यांना तीन वेळा रसरंग फाळके गौरवचिन्ह पुरस्कार देण्यात आला आहे. अशा या प्रतिभाशाली लेखकाचे १७ डिसेंबर १९८५ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

# अभिनेते आणि दिग्दर्शक मिथुन गणेशन

रामास्वामी गणेशन (१७ नोव्हेंबर १९२० -२२ मार्च २००५), जे त्यांच्या रंगमंचावरील नाव जेमिनी गणेशन या नावाने ओळखले जातात. ते एक भारतीय अभिनेते होते ज्यांनी प्रामुख्याने तमिळ चित्रपटांमध्ये काम केले. चित्रपटांमधील त्यांच्या रोमँटिक भूमिकांसाठी त्यांना काधल मन्नन (प्रेमाचा राजा) असे संबोधले जात असे.

जेमिनी गणेशन हे तमिळ चित्रपटातील तीन सर्वात मोठ्या नावांपैकी एक होते, इतर दोन म्हणजे एमजी रामचंद्रन आणि शिवाजी गणेशन. शिवाजी गणेशन यांनी नाट्यमय चित्रपटांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आणि एमजी रामचंद्रन ॲक्शन हिरो म्हणून लोकप्रिय होते, तर जेमिनी गणेशन त्यांच्या रोमँटिक चित्रपटांसाठी ओळखले जात होते.

जेमिनी गणेशन यांचा जन्म पुडुक्कोटाई रियासत, ब्रिटिश भारत आता पुडुक्कोटाई, तमिळनाडूमध्ये झाला. त्यांनी रसायनशास्त्रात पदवी प्राप्त केली आणि



काही काळ त्यांच्या अल्मा मॅटर, मद्रास ख्रिश्चन कॉलेज, तांबरम येथे शिक्षक म्हणून काम केले आणि नंतर जेमिनी स्टुडिओमध्ये कास्टिंग असिस्टंट म्हणून नोकरी स्वीकारली. याच संघटनेमुळे त्यांना जेमिनी हे टोपणनाव मिळाले. चित्रपटांच्या जगात गणेशन यांचा पहिला प्रवेश दिग्दर्शकाच्या सहाय्यक म्हणून (आणि थोडक्यात अभिनेता म्हणून) मिस मालिनी (१९४७) या चित्रपटात झाला. सुरुवातीला त्यांना कोणाचेही लक्ष नव्हते, परंतु थाई उल्लम (१९५२; मदर्स हार्ट) या चित्रपटात खलनायकाच्या भूमिकेनंतर गणेशन यांना ओळख मिळाली.


गणेशन यांच्या चित्रपट कारकिर्दीत पाच दशके झाली आणि त्यात सुमारे २०० चित्रपटांचा समावेश होता. त्यापैकी बहुतेक तमिळ भाषेत होते, तर काही हिंदी, तेलगू, मल्याळम आणि कन्नड भाषेत होते. त्यांच्या अनेक पुरस्कारांमध्ये कलाइमामणी पुरस्कार (तामिळनाडू राज्याकडून कला क्षेत्रातील कलाकारांना दिला जाणारा), एमजीआर सुवर्णपदक आणि फिल्मफेअर जीवनगौरव पुरस्कार (फिल्मफेअर मासिकाद्वारे प्रदान केला जाणारा) यांचा समावेश आहे. १९७१मध्ये त्यांना भारताच्या सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी एक असलेला पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. (साभार : इंटरनेट)

# खालापुरात अंधश्रद्धेतून वयोवृद्धाला मारहाण

## १२ जणांवर गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

महाकाली मंदिरात जाऊन कोणती तरी पूजा केली या गैरसमजुतीने कृष्णा रामचंद्र कदम (वय ७१, रा.गोळेवाडी खांबेवाडी खालापूर) यांना जबर मारहाण झाल्याची घटना घडली आहे. गंभीर जखमी झाल्याने महिनाभराच्या उपचारानंतर कृष्णा कदम यांनी उशिरा खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.



कृष्णा कदम हे २० फेब्रुवारी रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास गावातील वाघजाई महाकाली देवीच्या मंदिरात दर्शनासाठी गेले होते. दर्शन घेतल्यानंतर मंदिराच्या पाठीमागे जाऊन त्याने नारळ फोडला. कृष्णा कदम याने कोणतेतरी अघोरी पूजा केली अशी गैरसमजूत करत निवृत्ती चव्हाण, जगन्नाथ चव्हाण, विलास चव्हाण यांनी त्यांचे घरात घुसून सामानाची तोडफोड केली. तसेच त्यांना घराबाहेर आणून संजय चव्हाण याने लोखंडी सळईने मारहाण केली. तसेच ओमकार कदम, गणेश दळवी, रवी चव्हाण, समीर चव्हाण, नरेश चव्हाण आणि संजय चव्हाण यांची पत्नी सर्व राहणार गोळेवाडी खांबेवाडी यांनी काठीने व आता बुक्क्याने मारहाण केली. यामध्ये कृष्णा कदम गंभीर जखमी झाले होते.

गंभीर जखमी कृष्णा कदम यांना त्यांचा मुलगा अनिल याने उपचार करता मुंबई येथे नेले होते. उपचारातून बरे झाल्यानंतर कृष्णा कदम यानी गुरुवार १९ मार्च रोजी खालापूर पोलीस ठाण्यात मारहाण करणाऱ्या विरोधात तक्रार दिली आहे.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार सतीश जगधने हे करीत आहेत.

# जल जीवन मिशन अंतर्गत कामे तातडीने पूर्ण करा -सभापती पारंगे



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेली अथवा अर्धवट कामे त्वरीत पूर्ण करा, असे स्पष्ट निर्देश खालापूर पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे यांनी दिले आहेत. यावेळी उपसभापती भाई शिंदे हेही उपस्थित होते.

खालापूर तालुक्यात सुरू असलेल्या जल जीवन मिशन अंतर्गत कामाचा आढावा सभापती कृष्णा पारंगे यांनी घेतला असून अर्धवट कामे त्वरीत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या, ज्या ठिकाणी काही अडचण असेल त्याची पूर्तता करा, अथवा त्याचा अहवाल सादर करण्यात यावेत हेही त्यांनी सांगितले.

जल जीवन मिशन ही केंद्र सरकारची एक महत्त्वाकांक्षी योजना असून, केंद्र सरकारने १५ ऑगस्ट २०१९ रोजी सुरू केली. या योजनेचे मुख्य उद्दिष्ट ग्रामीण भागातील प्रत्येक घराला नळाद्वारे दररोज प्रति व्यक्ती ५५ लिटर शुद्ध आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हे आहे.

यावेळी बैठकीस गटविकास अधिकारी संदीप कराड, उपसभापती भाई शिंदे, पाणी पुरवठा अभियंता संतोष चव्हाण, पंचायत समिती सदस्य, सरपंच, लोकप्रतिनिधी, जल जीवन मिशन कर्मचारी, ठेकेदार उपस्थित होते. खालापूर तालुक्यात एकूण ९१ कामे मंजूर असून ३५ कामे पूर्ण झाल्याची माहिती पाणी पुरवठा अभियंता संतोष चव्हाण यांनी दिली. १२ कामांची काम झाल्याची टक्केवारी ७५ ते ९५ टक्के आहे. ३९ कामे ५० ते ७५ टक्के झाली आहेत. तर ५ कामे यांची काम झाल्याची टक्केवारी २५ ते ५० टक्के आहे अशी माहिती देण्यात आली. ९५ टक्के पर्यंत झालेली कामे येत्या ३१ मार्च अखेरीस पूर्ण करण्यात येतील, असे संतोष चव्हाण यांनी सांगितले.

खांबेवाडी, वावर्ले, गोरठण बु.,आपटी, वडविहीर, चिंचमाळ, धारणी, कारगाव, सारसन, वडवळ, पौद, नारंगी या १२ गावांची कामांची लवकर पाहणी करण्यात येईल, असे उपसभापती भाई शिंदे यांनी स्पष्ट केले.

# परप्रांतीयाचा आकस्मिक मृत्यू

**खोपोली :** अचानक बेशुद्ध झालेल्या प्रसनजीत रामचरण मंडल (वय २२ सध्या रा. आपटी डोणवत मूळ रा. पश्चिम बंगाल) याचा अकस्मात मृत्यू झाल्याची घटना खालापूर हद्दीत घडली आहे. प्रसनजीत हा त्याचा भाऊ बापन रामचरण मंडल सोबत आपटी डोणवत येथे राहत होता. शुक्रवारी संध्याकाळी पावणेपाच वाजण्याच्या सुमारास प्रसनजीत याला तीव्र खोकला सुरू झाला. खोकताना तो बेशुद्ध पडल्याने त्याला खोपोली नगरपालिका रुग्णालयात उपचाराकरता दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्याला तपासले असता त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. मृत्यू हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने झाल्याचा अहवाल डॉक्टरांनी दिला आहे. याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास पोलीस हवालदार एम जगधने करत आहेत.

# खालापूर पं.स.मध्ये नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची पहिली सभा

## ओळख आणि आगामी कामाचा आढावा



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पंचायत समिती सभागृहात सर्व नवनिर्वाचित सदस्य आणि अधिकारी यांची विशेष बैठक पार पडली. यात नवनिर्वाचित सदस्य यांचा व अधिकारी, कर्मचारी यांची ओळख करून देण्यात आली.

पंचायत समिती खालापूर सभापती कृष्णा गंगाराम पारंगे, उपसभापती भाई रघुनाथ शिंदे, सदस्य रितेश बळीराम जाधव,सदस्या कमल राम भस्मा, अर्चना आत्माराम भोईर, गौरी महादेव गडगे, प्रमिला महेश पाटील आणि श्रीमती देवयानी अजित देशमुख यांच्या उपस्थितीत पहिली सभा झाली. गटविकास अधिकारी संदीप कराड, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रदीप कांबळे तसेच पंचायत समिती खालापूरचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्व प्रथम नवनिर्वाचित सदस्यांची आणि पंचायत समिती खालापूर येथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची ओळख करून देण्यात आली.

सभेत विविध विकास योजनांवर चर्चा करण्यात आली. मार्गदर्शन करण्यात आले तर काही विषयात मार्गदर्शन देण्यात आल. योजनांच्या अंमलबजावणीसाठी उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी व सर्व अधिकारी व कर्मचारी एकजुटीने कार्य करण्याचा संकल्प केला. सर्व उपस्थित सदस्यांनी या बाबतीत एकत्रितपणे काम करणार असल्याचे सांगितले. सभेत विविध ग्रामीण विकासाच्या योजनांचे सुक्ष्म विश्लेषण करण्यात आले आणि भविष्यातील कार्यासंबंधी आवश्यक दिशा देण्यात आली.

यावेळी सभेचे आयोजन खेळीमेळीच्या वातावरणात झाले, ज्यामुळे एक सकारात्मक कार्यशक्ती निर्माण झाली आणि सर्व सदस्यांनी एकमेकांशी संवाद साधताना सर्वांचा उत्साह वाढवला.

# क्रांती दिनी बिस्किट, पाणीवाटप

**माणगाव :** संबोधी विहार व बौद्धजन पंचायत समिती इंदापूर विभागाअंतर्गत शुक्रवार दिनांक २० मार्च २०२६ रोजी महाड चवदार तळे क्रांति दिनानिमित महाड येथे जाणाऱ्या भीम अनुयायांना बिस्किट व पाणी वाटप हे करण्यात आले. यावेळी जि.प. सदस्य दिशा जाधव, मणगाव प. स. उपसभापती मनीषा मालोरे, तसेच भुवन सरपंच दीपक जाधव, माणगाव तालुका राष्ट्रवादीचे अध्यक्ष काका नवगणे, शेखरशेठ देशमुख, डॉ. आदेश घोणे, समाजसेवक सागर संसारे, संदेश मालोरे,उदय अधिकारी, समीर मेहता, नितीन घोणे, राजेश कदम, राम येलकर, संबोधी विहार समिती व बौद्धजन पंचायत समिती इंदापूर विभागातील कार्यकर्ते व पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# रोहा अष्टमी नगर परिषदेच्या विविध कामांचे आज भूमिपूजन व लोकार्पण

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील रोहा अष्टमी शहरातील विविध कामाचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा खासदार सुनील तटकरेंच्या हस्ते रविवार, २२ मार्च रोजी सायंकाळी होणार आहे.

या कार्यक्रमास महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, सभापती राजेंद्र जैन, महेंद्र दिवेकर, महेश कोलाटकर, रवींद्र चाळके, नीता हजारे, गौरी बारटक्के, गटनेते महेंद्र गुजर आदीसह नगरसेवक, नगरसेविका उपस्थित राहणार आहेत.

सायंकाळी ५ पासून विविध कामाचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा सुरू होणार असून सायंकाळी रोहा शहरातील कुंडलिका नदी संवर्धन गार्डन येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आले आहे. रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील फिरोज टॉकिज ते धावीर मंदिर नागरी वस्तीकडे जाणारा रस्ता डाबरीकरण करणे या कामाचे लोकार्पण,सायंकाळी ५.१५ वा. रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीमध्ये क्लॉक टॉवर कार्यान्वित करणे या कामाचे भूमिपुजन सायंकाळी ५.३० वा. रोहा अष्टमी नगर परिषद करिता वैशिष्टपूर्ण योजनेंतर्गत नमो उद्यान विकसीत करणे.

# कर्जतमध्ये रमजान ईद साजरी



**कर्जत :** येथील शहरामध्ये रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मुस्लिम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. दाऊदी बोहरा समाजाची रमजान ईद दोन दिवसांपूर्वी म्हणजे गुरुवारी साजरी करण्यात आली.

रमजान पर्वकाळात मुस्लीम बांधवांनी महिनाभर निर्जळी उपवास करत अल्लाहची उपासना (इबादत) केली. यावर्षी संपूर्ण रमजान पर्व मार्च महिन्यात उन्हाच्या तीव्रतेत पार पडले, तरीदेखील आबालवृद्धांचा उत्साह बघावयास मिळाला.

कर्जत शहरातील सुन्नी जामा मस्जिद मध्ये नवीन कपडे परिधान करून सुगंधी अत्तर लावून मुस्लिम बांधव ईद साजरी करण्यासाठी सकाळी मशिदी मध्ये पोहचले होते, मशिदींमध्ये सामूहिक नमाज अदा करण्यात आले. नमाज अदा झाल्यावर मुस्लिम बांधवांनी मशिदी बाहेर एकमेकांना मिठ्या मारून शुभेच्छा दिल्या. प्रत्येक मुस्लिम बांधवाच्या घरी सिर कुर्मा तयार करण्यात आला होता. त्याचा आस्वाद हिंदू बांधवानीही घेतला.

पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उमेश पाटील मशिदी जवळ स्वतः हजर होते त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## घरोघरी आकर्षक सजावट

***रमजान ईदनिमित्ताने मुस्लिम नागरिकांच्या घरी उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण दिसून येत आहे. घरोघरी रमजान ईद निमित्ताने आकर्षक विद्युतरोषणाई करण्यात आली आहे. तसेच, घरही उत्साहाने सजविण्यात आले होते.***

# माणगाव तालुक्यात रमजान ईद उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

ईद-उल-फित्र म्हणजेच रमजान ईद माणगाव तालुक्यात शनिवार, २१ मार्च २०२६ रोजी सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. या ईदनिमित्त मुस्लिम बांधवानी ईदची मशिदीमध्ये सामुदायिक नमाज (प्रार्थना) अदा केल्यावर गळाभेट आलिंगन देत एकमेकांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.



माणगाव तालुक्यातील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला, बाजारटेप मोहल्ला, नाणोरे, लोणशी, मोर्बा, साई, निजामपूर, दहिवलीकोंड, दहिवली, तारणा, वडवली, मांजरवणे, नांदवी, पुरार, वणीमलई कोंड, हारकोल, गोरेगाव, टेमपाले, लाखपाले, देवळी, टोळ, टोळ खुर्द आदी सर्वच गावांतून रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली. माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथील जामा मशिदीत हजारोंच्या संख्येने उपस्थित राहत मुस्लिम बांधवानी रमजान ईदची सामुदायिक नमाज अदा केली.

यावेळी मौलाना हाजिमिया जामदार यांनी कुराण पठण करून उपस्थित मुस्लिम बांधवाना रमजान ईदचे महत्व सांगितले. या रमजान ईदनिमित्त माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड.राजीव साबळे, माणगाव नगरीचे माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, सामाजिक कार्यकर्ते संजयअण्णा साबळे, नामदेव शिंदे, नथुराम पाष्टे, मस्जिद मोहल्ला अध्यक्ष अब्दुलरहिमान हाजीते, उपाध्यक्ष सिराज अफ़वारे, तालुका राष्ट्रवादीचे अध्यक्ष काका नवगणे,राजिप सदस्य अविनाश नलावडे, अस्लम राऊत, अल्ताफ धनसे, पुंडलिक गायकवाड, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्यासह अनेकांनी मुस्लिम बांधवांची प्रत्यक्षात भेट घेत तसेच अनेक हिंदू बांधवानी दूरध्वनी व मोबाईलवरून संदेश पाठवून मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.

# रोह्यात रमजान ईद; पोलिसांकडून गुलाबपुष्प

**रोहा, धाटाव : प्रतिनिधी**

इस्लाम धर्मातील सामाजिक ऐक्य, प्रेम, बंधूभाव व मानवतेची शिकवण देणाऱ्या पवित्र रमजान ईद रोहे शहर व ग्रामीण भागातील मुस्लिम समाज बांधव व भगिनींनी पहाटे नमाज अदा करुन मोठ्या उत्साहात पारंपारिक पद्धतीने तसेच एकमेकांना गळाभेट देऊन ईद साजरी केली.



विशेष म्हणजे ईदच्या अनुषंगाने हिंदू बांधवांनीदेखील शुभेच्छा देत हिंदू-मुस्लिम ऐकतेचा संदेश दिला, तर पोलीस प्रशासनाने ईदच्या नमाज नंतर मशीदी समोर मुस्लिम समाज बांधवांना गुलाब पुष्प देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या.

रमजान ईदच्या निमित्ताने रोहे शहरातील जामे मस्जिद, मस्जिद ए अबू बकर,सलमान फारसी मस्जिद, वरचा मोहल्ला मस्जिद,अष्टमी जामे मस्जिद त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील कोकबन, न्हावे, सूडकोली, खैरे खुर्द, चणेरा, चांडगावं, कोलाड, नागोठणे व बेणसे येथील मशीदीत पहाटे नमाज अदा केल्यानंतर ईदची नमाज अदा केल्यानंतर मौलवी यांनी खुतबा पठण केले. समाजचे अध्यक्ष व सचिव तसेच पोलीस निरीक्षक सुयश कुमार सिंग, सपोनि सूर्यकांत पवार यांनी तमाम मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

रोहा जामे मस्जिद अध्यक्ष हाफिज एजाज किरकिरे, वरचा मोहल्ला अध्यक्ष अलीम मुमेरे, सलमान फारसी मस्जिद अध्यक्ष मौलाना मसरूर अलम, मस्जिद ए अबू बकरचे अध्यक्ष अब्बास आली अनवारे, अष्टमी मस्जिदचे अध्यक्ष जमीर कर्जिकर आदींना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

# तुपगाव चौक येथे ईदचा उत्साह

**चौक : प्रतिनिधी**

तुपगाव चौक येथे रमजान ईद (ईद-उल-फित्र) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली, अनेकांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

रमजान ईद,पवित्र रमजान महिन्याचा शेवट आणि शव्वाल महिन्याची सुरुवात असते. मुस्लिम बांधव महिनाभर उपवास (रोजा) केल्यानंतर आज ईद साजरी करून आनंद, कृतज्ञता आणि बंधुत्वाचे प्रतीक म्हणून साजरा केला जातो. सकाळी चौक व परिसरातील नमाज अदा करण्यासाठी आलेले मुस्लिम बांधव नमाज अदा केल्यानंतर एकमेकांना ईद मुबारक शुभेच्छा दिल्या. खास शीर खुरमा आणि विविध गोड पदार्थ यांचे वाटप केले.



ईदच्या नमाज अदा केल्यावर आपण जागतिक शांतता, समृद्धी, युद्ध बंदी आणि सुखासाठी विशेष प्रार्थना केली असे सामाजिक कार्यकर्ते व उद्योगपती यासिन भालदार यांनी सांगितले. खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार, सपोनी. मनीष मोरे, पोलीस उप निरीक्षक नितीन सांगळे, चौक प्रभारी विशाल पवार, पत्रकार अर्जुन कदम व अन्य कार्यकर्त्यांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

# मुरूड येथे ऐतिहासिक शस्त्रे, शिवकालीन नाणी प्रदर्शन

**मुरूड : प्रतिनिधी**

ऐतिहासिक वारसा लाभलेल्या मुरुड येथील सार्वजनिक वाचनालयात दोन दिवसाचे ऐतिहासिक शस्त्रे व शिवकालीन नाणी यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनात विविध प्रकारच्या तलवारी, ढाली, भाले, कट्यारी, विटा, गुर्ज, माडू तसेच इतरही निरनिराळी शस्त्रे दर्शकांना पाहायला मिळत आहेत. त्याचबरोबर मुरुड नगरीचा ऐतिहासिक मोडी लिपीतील नकाशा हे या प्रदर्शनाचे प्रमुख आकर्षण आहे.



इतिहास अभ्यासक व ऐतिहासिक शस्त्र संग्राहक अनिकेत अशोक पाटील यांच्या संग्रहातील ऐतिहासिक शस्त्रे, नाणी व मुरुडचा ऐतिहासिक नकाशा सार्वजनिक वाचनालय मुरुड येथे प्रदर्शनाकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती .या कार्यक्रमाला वाचनालयाचे अध्यक्ष जयवंत अंबाजी, अच्युत चव्हाण, दीपाली जोशी, सिद्धेश लखमदे, स्वप्नील भायदे तसेच वाचनालयाच्या कार्यकारिणीचे इतर सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन तसेच दीपप्रज्वलन करून करण्यात आली. ऐतिहासिक शस्त्रे व शिवकालीन नाणी प्रदर्शनाचे उद्घाटन मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. त्यानंतर हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले करण्यात आले. आज प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी स्थानिक नागरिकांसह विदेशी पर्यटकांनीही प्रदर्शनाला भेट देऊन आपली उपस्थिती नोंदवली.

# खोपोलीत गीतरामायणाचा कार्यक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

चैत्र नवरात्रीच्या कालावधीमध्ये स्वराक्षर, पणे प्रस्तुत डॉ केदार करंदीकर यांच्या वतीने गीत रामायणाचा कार्यक्रम खोपोली ब्राह्मण सभेच्या विमलताई बिवरे सभागृहामध्ये शुक्रवारी आयोजित करण्यात आला होता. त्याला रसिक श्रोत्यांनी भरभरून दाद दिली.



डॉ केदार करंदीकर यांनी आपले वडील गीता धर्म मंडळाचे माजी सहकार्यवाह कै. डॉ ग.वा. करंदीकर यांच्या स्मरणार्थ हा कार्यक्रम सादर केला.

गा बाळांनो श्री रामायण या भैरवी ने कार्यक्रमाची सांगता झाली. डॉक्टर केदार करंदीकर, वरदा करंदीकर, श्रुती देवस्थळी, वैभव दलाल यांनी ही सुरेल गीते सादर केली. त्यांना संवादिनीवर प्रसन्न बाम, तबल्यावर अमित कुंटे, तालवाद्य आदित्य आपटे यांची साथ लाभली. स्नेहल दामले यांच्या उत्कृष्ट निवेदनामुळे कार्यक्रमाची रंगत आणखी वाढली.

कार्यक्रमाला ब्राह्मण सभेच्या उपाध्यक्ष सपना पित्रे, कार्यवाह वृषाली बेलसरे, खजिनदार सुधाकर भट, सह खजिनदार अपर्णा साठे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, रवींद्र बेलसरे, शिरीष बिवरे, उल्हास देशमुख, ज्येष्ठ नागरिक सभेचे अध्यक्ष रवींद्र घोडके, रोटरी क्लबच्या अध्यक्षा सुनिता चव्हाण, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा दिना शाह, डॉक्टर राहुल मुळेकर आदी उपस्थित होते.

# उरणमध्ये कांदळवन स्वच्छता अभियान

**उरण : वार्ताहर**

उरण कोळीवाडा येथे नुकतेच कांदळवनवासीयांना कांदळवन स्वच्छता अभियानाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉमनिक कोळी कांदळवन सह व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांनी केले. तेथील ग्रामस्थांना कांदळवन संरक्षण कायदा आणि कांदळवनाचे महत्त्व व फायदे याविषयी माहिती दिली. तसेच कांदळवन वासियांना सरकारने विविध प्रकारचे उपक्रम व योजना या बाबतीत किशोर रघुनाथ सोनावणे यांनी सविस्तर माहिती दिली



यानंतर सर्व उपस्थित कांदळवन वासिय आणि वनविभागाचे किशोर रघुनाथ सोनावणे, विशाल मोहळे, नरेश म्हेत्रे, अमर निकम, प्रज्ञा शिंदे आणि डॉमनिक कोळी, पिटर कोळी, वेरोनिका कोळी, श्रध्दा कोळी, संगिता कोळी आणि मनवेल कोळी तसेच सोवार कोळी, अंतोन कोळी, मायकल कोळी, मोझेस कोळी, अशोक कोळी, विल्सन कोळी, अनिकेत कोळी, रिषभ कोळी, मेबल कोळी, प्रियांका कोळी, मार्था कोळी, प्रमिला कोळी, मरिना कोळी, सॅन्ड्रा कोळी, उषा कोळी, रीटा कोळी, मेरी कोळी, रेझिना कोळी, प्रियांका कोळी, जॅकलिन कोळी, वनिता कोळी, लिना कोळी, वैशाली कोळी, ग्लोरी कोळी, स्टेलिना कोळी, मॅगी कोळी, अनिता वैती, वेलंकनी कोळी आणि इतर सर्व ग्रामस्थांनी कांदळवनात टाकलेल्या प्लास्टिकच्या पिशव्या, बॉटल आणि इतर घनकचरा यांची सर्वांनी मिळून साफसफाई केली त्या करिता वनविभागाने आणलेल्या हॅन्ड ग्लोज व मास्क आणि सॅनिटायझर या गोष्टींचा कामाच्या ठिकाणी वापर केला.

सर्वात शेवटी कांदळवन संरक्षणा विषयी जागृती अभियान आणि कांदळवन विभागाचे साफसफाई कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडला तेव्हा उपस्थितांचे आभार डॉमनिक कोळी यांनी मानले आणि सदर कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

## वाहतूक पोलिसांच्या सुरक्षेसाठी हेल्मेटचे वाटप

**कळंबोली: बातमीदार**

जनतेच्या सुरक्षेसाठी २४ तास कार्यरत असणाऱ्या वाहतूक पोलिसांसाठी राईट टू सेफ्टी या सामाजिक उपक्रमांतर्गत कळंबोली वाहतूक शाखेतील सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना हेल्मेटचे वाटप करण्यात आले.

यावेळी पोलीस कर्मचारी वर्गाने समाधान व्यक्त केले. हेल्मेटचे वाटप कळंबोली वाहतूक शाखा नवी मुंबई चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय भोसले यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आले. यावेळी वाहतूक शाखेतील पोलीस उपनिरीक्षक पांडुरंग साठे, काझी, गलांडे उपस्थित होते.



कळंबोली वाहतूक पोलिसांना हेल्मेट चे वाटप आयसीआयसी लोम्बार्ड विमा कंपनी आणि सेवा सहयोग फाउंडेशनच्या राईड टू सेफ्टी या उपक्रमांतर्गत करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सेवा सहयोग फाऊंडेशनकडून विनय बर्वे, राईड टू सेफ्टी प्रकल्प प्रमुख व गणेश संसारे प्रोजेक्ट को ऑर्डिनेटर उपस्थित होते.

## खोपटा-कोप्रोली रस्ता, पुलाच्या दुरुस्तीबाबत निवेदन

**उरण : वार्ताहर**

खोपटा-कोप्रोली रस्त्याच्या कामाच्या व खोपटा पुलाच्या दुरुस्तीच्या कामात होत असलेल्या काम चुकारपणा बाबत माजी जिल्हा परिषद सदस्य तथा भाजप जिल्हा कार्यकारिणी सदस्य जीवन गावंड यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग उरण उपअभियंता नरेश पवार यांना निवेदन दिले.



निवेदनात असे म्हटले आहे की, अनेक सामाजिक संस्था, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच यांनी अनेक वेळा पत्र व्यवहार केले आहेत. खोपटा पुलाच्या दुरुस्तीच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात शासनामार्फत निधी मंजूर झाला आहे. खोपटा कोप्रोली रस्त्याचे कामही सुरू झाले आहे, परंतु सदर काम सुरू असतांना वाहतूक सुरू राहण्यासाठी योग्य प्रकारे नियोजन न केल्यामुळे जनतेला खूप त्रास होत आहे.

तासानतास रस्त्यात थांबावे लागत आहे. मी अनेक वेळा संपर्क केला आहे. मला व जनतेला योग्य प्रकारे उत्तर मिळत नाही. त्यामुळे आपणाकडून कश्या पद्धतीने कामे चालू आहेत हे जनतेला समजत नाही. विनाकारण जनतेला वाहतूक कोंडीचा त्रास होतो. या बाबत लोकप्रतिनिधींना दोषी ठरविले जाते आपण पुढील सात दिवसांत योग्य ते कामकाजाचे नियोजन वेगवेगळ्या मार्गाने करावे हि विनती अन्यथा जन आंदोलन उभारू व त्याची सर्वस्वी जवाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची असेल असाही इशाराजीवन गावंड यांनी दिलेल्या निवेदनातून केले आहे.

## मोहोपाडा राजिप शाळेतील विद्यार्थी, शिक्षकांचे कौतुक



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद केंद्र शाळा मोहोपाडा तालुका खालापूर येथील काजल आनंदराव खिल्लारे ही एनएमएनस शिष्यवृत्तीधारक झाल्याबद्दल तिला उपशिक्षणाधिकारी सुनील भोपळे यांच्या हस्ते १११११ रुपये बसीस देऊन गौरविण्यात आले तसेच सेवानिवृत्त उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभागाचे रवींद्र गिरी यांच्याकडूनही शिष्यवृत्तीधारक काजलला १११११ रुपये रोख बक्षीस देण्यात आले.

याचबरोबर एसईआरटी पुणे यांच्याकडून तयार करण्यात आलेल्या आयडॉल टिचर बँकमध्ये रायगड जिल्ह्यातून मोहोपाडा शाळेच्या शिक्षिका रूपाली पाटील यांची आयडॉल टिचर म्हणून निवड झाल्याबद्दल उपशिक्षणाधिकारी सुनील भोपळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

उटशिक्षणाधिकारी परब मॅडम, केंद्रप्रमुख किशोर परदेशी, शाळेच्या मुख्याध्यापिका खराडे मॅडम आदी उपस्थित होते. यावेळी गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांचे उपस्थितांनी कौतुक केले.

## सीबीडी-बेलापूर येथे स्वामी समर्थ प्रकट दिन उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

सीबीडी-बेलापूर से ८ येथील श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक-बालसंस्कार केंद्र येथे २० मार्च रोजी श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. सालाबादप्रमाणे यावर्षीही संस्थेमार्फत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे प्रकट दिन सोहळा आयोजनाचे यंदा १८ वे वर्ष होते.

यावेळी शेकडो स्वामी भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला. संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष हेमंत आढाव, त्यांचे सहकारी श्रावण व्हावले, ऍड. अरुण जोशी, संदीप निळे, रमाकांत डगळे, महेश शेलार, जॉन मेंढीस, सुधीर दंदाडे, वैभव शेलार, वेदिका चारी तसेच इतर सेवेकरी उपस्थित होते. पराग बारापत्रे व पल्लवी बारापत्रे यांच्या शुभहस्ते श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन पुजा झाली. यावेळी समाजसेवक मोतीराम पालकर, स्मिता पाटील यांची विशेष उपस्थित होती.



सालाबादप्रमाणे यावर्षीही श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक-बालसंस्कार केंद्र येथे श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन सोहळा आयोजित करण्यात आला. सकाळी ८ वाजल्यापासून या केंद्रामध्ये भक्तांची गर्दी होती. सकाळी श्री स्वामी समर्थांची यथोचित पूजा संपन्न झाली. अनेक स्वामी सेवेकऱ्यांनी या सोहळ्यानिमित्त सेवा म्हणून कार्य पाहिले.

## पीएनजी ज्वेलर्सने गाठला १० हजार कोटी महसूलाचा टप्पा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पी.एन.गाडगीळ (पीएनजी) ज्वेलर्सने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये १०,००० कोटी रूपये महसूलाचा महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. हा महत्त्वाचा टप्पा व्यवसायातील मजबूत गती दर्शवतो.शिवाय गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर कंपनीने १७०.७ कोटी रूपयांची विक्री केली असून मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत ३८ टक्के वाढ झाली आहे.



सोन्याचा विभाग हा महसूल वाढीसाठी मुख्य चालक ठरला असून याच्या महसूलात वर्षागणिक ३५ टक्के वाढ झाली आहे.त्याचबरोबर हिरे आणि चांदीच्या विभागांनी अनुक्रमे ६१ टक्के आणि ११८ टक्के इतकी मजबूत वाढ दर्शवली आहे.

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.सौरभ गाडगीळ म्हणाले की, रूपये १०,००० कोटींच्या महसूलाचा टप्पा पार करणे हा आमच्या प्रवासातील एक महत्त्वाचा क्षण असून, हा टप्पा गाठण्याची आमची दीर्घकाळापासून आकांक्षा होती. हा टप्पा आमच्या ग्राहकांचा दृढ विश्वास आणि आमच्या कर्मचाऱ्यांची अथक समर्पणाचा पुरावा आहे.या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच हे यश प्राप्त करणे शक्य झाले आहे.

गुढीपाडवा हा आमच्यासाठी नेहमीच महत्त्वाचा सण राहिला आहे. यावर्षी सोन्याच्या वाढलेल्या किमती असूनही यावर्षी आमच्या सर्व बाजारपेठांमध्ये ग्राहकांचा जोरदार प्रतिसाद मिळाला असून यामधून १७०.७ कोटी रूपयांची विक्री झाली आहे.ही कामगिरी आमच्या ब्रँडची ताकद आणि विविध श्रेणी आणि बाजारपेठांमधील आमची सातत्यपूर्ण कामगिरी दर्शविते.

ही कामगिरी आम्ही अशाच प्रकारे कायम ठेवण्यावर आशावादी आहोत. सध्या सुरू असलेला लग्नसराईचा हंगाम, नवीन बाजारपेठांमध्ये सुरू असलेला विस्तार आणि आकर्षक डिझाईन्स आणि मूल्य देण्यावर असलेले आमचे सातत्यपूर्ण लक्ष यामुळे आम्ही आर्थिक वर्षाचा शेवट यशस्वीपणे करण्यासाठी सज्ज आहोत.

## रसायनीत गुढीपाडव्यानिमित्त शोभायात्रा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गुढीपाडवा व हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी रसायनी परिसरात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. ही शोभायात्रा वृंदावन फ्लोरा सोसायटी व पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट व साहस फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोठ्या उत्साहात पार पडली.

मोहोपाडा छत्रपती शिवाजी महाराज चौकातून या शोभायात्रेला प्रारंभ झाला. यावेळी रसायनीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, हजारो नागरिकांनी रॅलीत सहभाग घेतला. पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशा, भगवे ध्वज आणि गुढ्या उभारून नववर्षाचे स्वागत करण्यात आले. संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. शोभायात्रा रात्री नऊ वाजता वृंदावन



फ्लोरा येथे पोहचताच जल्लोष करुन महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला.

वृंदावन फ्लोरा सोसायटीच्या वतीने अत्यंत शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामुळे रसायनीकरांकडून सोसायटीच्या कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले.

या कार्यक्रमाला मान्यवरांची उपस्थिती लाभली. यामध्ये रुची सोया पतंजलीचे मॅनेजर संजीव भनोत, जिल्हा परिषद सदस्य नेहा पारंगे, सरपंच उमाताई मुंढे, सभापती कृष्णा पारंगे, माजी सरपंच अशोक मुंढे, माजी सरपंच सचिन तांडेल तसेच बापू गुंजाळ, प्रमोद प्रजापती, अरुण गोविंद जाधव (अध्यक्ष, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट), दिपिका भंडारकर, चित्रा मैदर्गीकर, योगेश कांबळे, प्रकाश देवघरे, उमेश मुंढे, स्वप्नील निर्भावाने, विलास जाधव, अनंत माळी, विलास कांबळे, वसंत पाटील, प्रवीण पवार, सागर कडवे, प्रशांत खरात,अल्पेश किस्मतराव, अनिल पाटील, लक्ष्मीकांत गलांडे, अमोल गोरे, समीर दाभोळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## नवी मुंबईत राष्ट्रीय सांख्यिकी प्रादेशिक प्रशिक्षण शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

देशाच्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचा मोठा वाटा असून देशाच्या एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादनात या क्षेत्राचे योगदान सर्वाधिक आहे. याच पार्श्वभूमीवर एनएसओतर्फे १ एप्रिल २०२६ पासून 'इन्कॉर्पोरेटेड सर्व्हिस सेक्टर एंटरप्रायझेस'चा वार्षिक सर्वेक्षण सुरू करण्यात येणार आहे.

या सर्वेक्षणाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय सांख्यिकी विभागीय प्रादेशिक कार्यालय, मुंबई यांच्या वतीने २३ मार्च २०२६ रोजी एकदिवसीय प्रादेशिक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर नवी मुंबईतील बँक ऑफ इंडिया मॅनेजमेंट डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट येथे होणार आहे.

या प्रशिक्षण शिबिराचा उद्देश क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सर्वेक्षणासाठी आवश्यक ज्ञान व कौशल्ये प्रदान करून सर्वेक्षणाची अंमलबजावणी सुरळीतपणे पार पाडणे हा आहे. देशातील कॉर्पोरेट सेवा क्षेत्राचा सविस्तर डेटाबेस तयार करणे हे या 'इन्कॉर्पोरेटेड सर्व्हिस सेक्टर' सर्वेक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. यापूर्वी अनइन्कॉर्पोरेटेड सेवा क्षेत्राचा सर्वेक्षण एनएसओ मार्फत नियमितपणे करण्यात येत आहे.

## मोहोपाडा येथे मोफत आरोग्य शिबिर

**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

ग्रामपंचायत तुराडे व अष्टविनायक हॉस्पिटल मोहपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिर राबविण्यात आले. हल्लीच्या धकाधकीच्या जीवनामध्ये अनेक लोकांमध्ये बी.पी. शुगर असे वजन वाढणारे आजारांची लक्षणे दिसून येतात आणि त्यामुळे नको त्या आजारांना सामोरे जावे लागते.

या अनुषंगाने आरोग्य शिबिर राबविण्यात आले. यावेळी आलेल्या रुग्णांचे बी.पी. शुगर. आणि वजन करून ई.सी.जी. तपासणी घेण्यात आल्या. आणि या तपासणीतून काही मोठ्या प्रकारचे आजार असल्यास त्या प्रकारचे शस्त्रक्रिया किंवा पुढील उपचार व शासनाच्या विविध योजनांद्वारे मोफत उपचार करण्यासाठी डॉक्टरांकडून मार्गदर्शन करण्यात आले. आणि ही सुविधा अष्टविनायक हॉस्पिटल मोहपाडा येथे हे सुरू करण्यात आल्याचे यावेळी डॉक्टरांनी आलेल्या रुग्णांना माहिती दिली.

यावेळी ग्रामपंचायत तुराडे सरपंच रंजना विश्वनाथ गायकवाड, उपसरपंच लीना मयूर ठाकूर, मालती वाघमारे, रिया प्रदीप माळी, पूजा चंद्रकांत भोईर, ग्रामपंचायत अधिकारी अस्मिता मोकल आणि इतर सदस्य उपस्थित होते.

तुराडे ग्रामपंचायत हद्दीमधील लोकांसाठी विविध योजनांची माहिती देऊन त्यांना विविध योजनांचा लाभ मिळवण्यासाठी सहकार्य केले जाते. त्यामुळे शिबिरासाठी आलेल्या रुग्णांमध्ये समाधान व्यक्त केले जात होते.



शिबिरासाठी आलेले डॉक्टर्स नर्स यांच्यासाठी ग्रामपंचायतच्या वतीने चहा व नाश्त्याचे जेवनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ३८ रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला. तसेच अष्टविनायक हॉस्पिटलचे डॉ. विशाल पाटील, डॉ. बालाजी जानराव, डॉ. आशिष कदम, नर्स शामली म्हात्रे, अलिषा मुलानी, साई सुरज पवार, मनीष गायकवाड आणि प्रदीप माळी, विश्वनाथ गायकवाड व ग्रामपंचायत कर्मचारी भालचंद्र कोंडीलकर, भारती गायकवाड आदी उपस्थित होते.

## लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात रयत माऊलींना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय कामोठे येथे रयत माऊली सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.



रयत शिक्षण संस्था ही आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था असून हि संस्था उभारताना जो त्याग लक्ष्मीबाईंनी केलेला आहे त्याच्या या कार्याला आज उजाळा देण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागीय अधिकारी श्री कोंगेरे साहेब यांच्या हस्ते रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यालयातील कुमारी ग्रीष्मा भगत, श्रद्धा पाटील, मयुरी पिंजारी, दक्ष फडतरे, रुद्र गायकवाड, सोहम अनुसे, प्रियांश पाटील यांनी लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या कार्याची माहिती दिली.

विद्यालयातील खुटले सर यांनी रयत माऊलींचा जीवन प्रवास सांगितला. मुख्याध्यापक कोंगेरे यांनी लक्ष्मीबाई पाटील यांनी केलेल्या विविध त्यागाची माहिती दिली. विद्यालयाकडून सर्व विद्यार्थ्यांना गोड खाऊ वाटप करण्यात आला. या कार्यक्रमाचे निवेदन डी .डी. पाटील आणि व्ही जे म्हसकर या शिक्षकांनी केले.

## ब्राह्मण सभेचा १९वा वर्धापन दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ब्राह्मण सभा नवीन पनवेल या संस्थेचा १९वा वर्धापनदिन झाला. या निमित्ताने वयाची पंचाहत्तरी पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार झाला तसेच कोकण रेल्वेवरील दरोड्याचा प्रयत्न उधळून लावणाऱ्या तिकीट तपासनीस महेश पेंडसे यांचा गौरव करण्यात आला. सभासद कलाकारांनी सादर केलेल्या दोन एकांकिका हे या वर्षीच्या सोहळ्याचे विशेष आकर्षण होते.

एकांकिका लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अभिजित परांजपे लिखित 'देन अ‍ॅण्ड नाऊ-ए टेल वुईथ थ्री एंडिंग्स' या एकांकिकेला प्रथम क्रमांक, मानसी कुलकर्णी लिखित 'जय स्त्री आराम' या एकांकिकेला द्वितीय पारितोषिक आणि शेखर अंबेकर लिखित 'वन बाय टू' या एकांकिकेला तृतीय क्रमांकाच्या पारितोषिकाने गौरविण्यात आले.



समीर खरे, आणि स्नेहा सोमण यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. सुषमा गोखले आणि श्रीपाद वैशंपायन आणि श्यामनाथ पुंडे यांनी एकांकिकेचे दिग्दिर्शन केले. अदित गोडबोले, गंधार देशपांडे, माधव भागवत यांनी पार्श्वसंगीत दिले. पद्मनाभ भागवत यांनी तंत्रसहाय्य केले. सोहम व्यवहारे यांनी प्रकाशयोजना केली.

## चिरनेर येथील प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक केंद्र शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पाडण्यात आले.यावेळी शाळेचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शिक्षकांचे प्रयत्न प्रेरणादायी असल्याचे गौरोदगार येथील उद्योगपती राजेंद्र खारपाटील यांनी आपल्या मनोगतातून काढले.



यावेळी उद्योगपती राजेंद्र खारपाटील यांच्या हस्ते वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कृषीनिष्ठ शेतकरी प्रफुल्ल खारपाटील, ग्राहक मंचाचे शशांक ठाकूर, मुख्याध्यापक बळीराम पाटील, शाळा कमिटीचे सचिन म्हात्रे, शिक्षक नेते बबन पाटील, मूर्तिकार गजानन चौलकर, मूर्तिकार नंदकुमार चिरनेरकर, शिवप्रसाद पंडित, विश्वनाथ गावंड, निर्भय म्हात्रे, समाधान ठाकूर, अशोक कांबळे, अरुण ठाकूर, बबन गोंधळी, गीता नवाळे, ज्योती म्हात्रे, पुष्पलता म्हात्रे, पल्लवी विश्वे, महेश सुतार, रोशन थळी तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गणेश गीते, कोळीगीते, शेतकरी गीते, देशभक्तीपर गीते, लावणी, पोवाडा यासारख्या गीत नृत्यांचे सादरीकरण करत उपस्थित रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. सूत्रसंचालन निर्भय म्हात्रे यांनी केले.

# रमजान ईद मुबारक!

## मुरुडमध्ये मुस्लिम बांधवांनी अदा केली नमाज



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड परिसरात रमजान ईद हा सण मोठ्या उत्साहात साजरा होतो. पूर्ण महिनाभर निर्जल उपास पकडून ईश्वराची (अल्ला) भक्ती केली जाते व त्यानंतर पहिली चंद्र कोर पाहून ईद साजरी केली जाते. यंदाही रजमाज ईद उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने मुस्लिम बांधवांनी सकाळी सामूहिक नमाज अदा केली.

ईदची पहिली नमाज नवाबकालीन इदगाहवर मुस्लीम बांधवांनी अदा केली. ही नमाज होतच मुरूड पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे व सहकारी यांनी मुस्लीम बांधवाना शुभेच्छा दिल्या.

इदगाहची नमाज झाल्यावर सर्व मुस्लीम बांधव एकमेकांना ईदच्या शुभेच्या देतात. घरी जाऊन शिरकुर्मा व विविध प्रकारचे पदार्थ खाऊन छोट्या मुलांना ईदी देऊन गरिबांना दान करण्याची परपंरा आहे. मुस्लीम मुले नवीन कपडे घालून व सायकलला फुगे लाऊन वाजवत बाजारात फेऱ्या मारतात. समुद्रावर ईदनिमित्त बहुसंख्य बांधव व महिला फिण्याचा आनंद घेतात.

याशिवाय राजपुरी गावचे मुस्लीम बांधव सकाळी ७ वाजता ईदची पहिली नमाज जंजिरा किल्ल्यासमोर इदगाहवर अदा करतात. हा इदगाह जंजिरा किल्ल्यासमोर समुद्र किनारी असल्याने नमाज पडताना मागे किल्ला दिसतो. हा परंपरा खूप वर्षांपासून सुरु आहे.

हिंदू बांधवांची दिवाळी तशीच मुस्लिम बांधवाची रमजान ईद. त्यामुळे या दिनी मुस्लिम बांधव नवीन वस्त्र परिधान करून नमाज अदा करतात. आपल्या कुटुंबाच्या सुखासाठी ते प्रार्थना करतात.

या दिवशी अदा केलेली नमाज सलात–अल–फज्र या नावाने ओळखली जाते. कुराणातील मान्यतांनुसार पवित्र रमजानमध्ये संपूर्ण महिनाभर रोजे ठेवणाऱ्यांना अल्लाह बक्षीस आणि इनाम देतो. म्हणूनच या दिवसाला ईद म्हणतात, असे सांगितले जाते.

संपूर्ण महिना प्रामाणिकपणे रोजा पूर्ण करण्यासाठी शक्ती, ताकद दिल्याबद्दल ईददिनी अल्लाहचे आभार मानले जातात. भूख, तहान यांची जाणीव माणसांना व्हावी या उद्देशाने रमजान महिन्यात रोजे ठेवले जातात. रोजा ठेवणे आद्य कर्तव्य मानले जाते. त्याची सांगता ईदने झाली. यानिमित्ताने उत्साह दिसून आला.

## तरुणांना देशसेवेसाठी तयार करा -ना. रामदास आठवले



**पोलादपूर : प्रतिनिधी**

दुर्गम डोंगराळ अशा भागातून कणखर तरुणांना लढाई प्रशिक्षणात पारंगत करून छत्रपती शिवाजी महाराजांनी अशक्य अशी स्वराज्य निर्मिती केली. आताच्या युगात सर्वच सुविधा उपलब्ध असताना तरुणांना देशासाठी आणि देशांतर्गत सुरक्षेसाठी घडविणे शक्य असल्याचा विश्वास केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केला.

पोलादपूर तालुक्यातील दिविल येथे ब्रह्मध्वजा सोशल फाऊंडेशन संचालित आर्मी, नेव्ही, एअर फोर्स, पोलीस भरती, क्रीडा तसेच आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक्रम शिक्षण संस्थेचे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री ना. आठवले यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास राज्याचे रोहयो खारजमीन विकास आणि फलोत्पादनमंत्री भरत गोगावले, जिल्हा परिषदेचे सदस्य चंद्रकांत कळंबे व डॉ.निलेश कुंभार, रिपाइंचे प्रकाश मोरे, पोलादपूर पं.स.सभापती अविनाश शिंदे, सदस्य साक्षी कांबळेकर, माजी सैनिक संघटनेचे पोलादपूर अध्यक्ष वाय.सी. जाधव, महाड अध्यक्ष कॅप्टन किसन सकपाळ, तुर्भे खुर्द सरपंच गोविंद उतेकर, धारवली सरपंच विलास सकपाळ, दिविल सरपंच सागर देवे, माटवण सरपंच बाया वाघे, सवाद सरपंच शर्मिला उतेकर, तुर्भे बुद्रुक सरपंच सुरेखा गोळे, कालवली सरपंच किरण पवार, पार्ले सरपंच आशा पवार तसेच समीर चिपळूणकर, ब्रह्मध्वजा सोशल फाऊंडेशनचे संस्थापक शशांक यादव, शिक्षण प्रसारक संस्था सवाद धारवलीचे संचालक संजय महाडीक व कार्यवाह दत्तात्रेय उतेकर आदी उपस्थित होते.

यावेळी मंत्री आठवले यांनी पुढे त्यांच्या खास शैलीमध्ये मंत्री भरत गोगावले यांचे कौतुक करताना आपणही राज्यात मंत्री होतो, आता केंद्रात मंत्री आहोत, अशी आठवण सांगून ब्रह्मध्वजा सोशल फाऊंडेशनचे काम संस्थापक शशांक यादव यांच्या माध्यमातून होत असताना स्वत:पासून सहकार्य करणार असून सर्वांचे सहकार्य मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली.

मंत्री भरत गोगावले यांनी, छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कर्मभूमीत आपण जन्मलो असून येथील जनतेने चारवेळा निवडून दिल्यानंतर राज्यात मंत्रीपद मिळाले आहे. या सत्तेच्या माध्यमातून आपल्या मतदार संघातील तरूणांना देशासाठी घडविणाऱ्या या शिक्षण संस्थेला आपण सर्व प्रकारची मदत करू, अशी ग्वाही दिली.

यावेळी माजी सैनिक संघटनेचे पोलादपूर अध्यक्ष वाय.सी.जाधव यांनी देशभक्तीपर काव्य सादर केले. आर्मी, नेव्ही, एअर फोर्स, पोलीस भरती, क्रीडा तसेच आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक्रम शिकविण्यासाठी ट्रेनर म्हणून आलेल्या जगदाळे यांचाही सत्कार करण्यात आला.

## घरगुती एलपीजी गॅस संबंधित समस्यांसंदर्भात संपर्क अधिकाऱ्यांची नियुक्ती

**अलिबाग : प्रतिनिधी**

सध्या जागतिक पातळीवर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर डिझेल तसेच घरगुती गॅसच्या तुटवड्याबाबत काही ठिकाणी अफवा पसरत आहेत. त्यामुळे घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत असल्याबाबत तसेच गॅस बुकिंग संदर्भातील नियमांबाबत नागरिकांपर्यंत योग्य माहिती पोहचण्यासाठी कोणतीही अडचण आल्यास गरिकांना मदत मिळावी याकरिता जिल्हा प्रशासनाने तालुकानिहाय संपर्क अधिकाऱ्यांची नियुक्ती केली

यामध्ये अश्विनी धनवे (९९६७८९७४४० पुरवठा निरीक्षण अधिकारी पनवेल), महेश पाटील (७७७५१९३११३, नायब तहसीलदार उरण), रवींद्र दळवी (१०४९१८६२९६ पुरवठा निरीक्षण अधिकारी कर्जत), मनोज पवार (७४०३३९७७७७, पुरवठा निरीक्षण अधिकारी खालापूर), हर्षल देशमुख (७८८९७४०६५२, पुरवठा निरीक्षण अधिकारी अलिबाग), महेंद्र गांगुर्डे (२०११९६१२३४, पुरवठा निरीक्षण अधिकारी मुरुड), सतीश शिंदे (९८९०८९१८५३, पुरवठा निरीक्षण अधिकारी पेण), हेमलता कुरसुंगे (८३९०६४६१८८, पुरवठा निरीक्षण अधिकारी रोहा), सुखदेव वाडणकर (८६०५९३९६३६, पुरवठा निरीक्षण अधिकारी सुधागड पाली), राहुल शितोळे (८६६८७४७९८३, पुरवठा निरीक्षण अधिकारी माणगाव), नागेश शेगोकर (९८२२२१००७६, पुरवठा निरीक्षण अधिकारी तळा), रूपाली सुने (७०२८४६९४४३, पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीवर्धन), चंद्रशेखर खोत (१९२२६९७१९२५, नायब तहसीलदार म्हसळा), योगिता सत्यगिरी (९२८४६३२१४४ पुरवठा निरीक्षण अधिकारी महाड), रितेश पदलमवार (९४०४१०२१२८, पुरवठा निरीक्षण अधिकारी पोलादपूर) यांचा समावेश आहे.

जिल्ह्यातील तालुकानिहाय घरगुती गॅस सिलिंडरच्या पुरवठ्याबाबत कोणतीही अडचण निर्माण झाल्यास वरील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा तसेच जिल्ह्याच्या टोल फ्री क्रमांक १००७वर संपर्क साधावा, असे आवाहन रायगड जिल्हा प्रशासनाने केले आहे तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनवणे यांनी कळविले आहे.


## राजेवाडीतील मशिदीत समता इफ्तारी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पवित्र कुरआन समजून घेतल्यास हा प्रेषित महंमद पैगंबरांनी मानवजातीस उध्दारक बाबींवर महत्वाची विधाने नमूद केली आहेत, मात्र आपण आपल्यापुरता धर्मग्रंथ म्हणून बाळगल्याने अन्य धर्मियांमध्ये याबद्दल अनेक गैरसमज निर्माण झाले आहेत. आपली मस्जिद तसेच धर्मविषयक मार्गदर्शन करणाऱ्या संस्था सर्वधर्मियांना अभ्यासासाठी तसेच जाणून घेण्यासाठी खुल्या ठेवल्यास बंधुभाव अधिक वाढेल, असे मत अकोला येथील इश्तियाक अहमद यांनी व्यक्त केले.

महाड तालुक्यातील राजेवाडीतील मशिदीत शिवराय ते भिमराय समता मार्चनिमित्त समता इफ्तारीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी अहमद बोलत होत.

कार्यक्रमास ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या



उल्का महाजन, नागेश जाधव, संविधानाचे अभ्यासक नूर खाँ पठाण, ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर, रायगडचा आवाज आणि कोकण की आवाज वृत्तपत्रांचे संपादक दिलदार पुरकर, मुफ्ती मोहसीन वाडेकर, हनिफ पुरकर, राजेवाडी मोहल्ला अध्यक्ष वहाब कापडी, इकबाल काझी, जहीर सावंत, मुराद चाफेकर, रफीक लंबाडे, फईम आलेकर, शैवाज धनसे, अब्दुल मजीद लोकरे, अब्दुलहक खलफे तसेच अनेक समाजबांधव उपस्थित होते.

यावेळी संविधानाचे अभ्यासक नूर खाँ पठाण यांनी, संविधानामध्ये कोठेही कोणत्याही विशिष्ट धर्माच्या लोकांसाठी असा उल्लेख नसल्याने जो या देशाचा मतदार आहे; त्याला या देशाचे नागरिकत्व आहे अशी माहिती देऊन संविधानाने देशातील सर्वधर्मिय, सर्वजाती, सर्व भाषा, प्रांत व वर्णाच्या लोकांना भारतीय म्हटले असल्याचे सांगितले.

ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांनी, आम्ही भारताची जनता अशा आशयाची सुरुवात संविधानामध्ये दिसून येते, हा आपण देशाचे मालक असल्याचा पुरावा आहे, असे म्हटले.

या इफ्तारीस प्रा.दीपक क्षीरसागर, नंदा म्हात्रे, अलका माटे, सुनंदा गायकवाड, लारा, दीक्षा, प्रज्वल, सुमीत, मनोज इवलेकर तसेच अन्य समता मार्चचे कार्यकर्ते, इम्रान कौचाली तसेच अनेक स्थानिक तरुणही उपस्थित होते.

## कृषी प्रक्रियादार आणि ग्राहक संमेलन

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील कृषी प्रक्रियादार आणि ग्राहक संमेलन नुकतेच रोहा तालुक्यील वरसे येथील ग्रामपंचायत सभागृहात राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने उत्साहात पार पडले.


या कार्यक्रमास नवनिर्वाचित जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील यांच्यासह विनोद पाशिलकर, रामा म्हात्रे, अमित मोहिते, संतोष भोईर, श्रीमंत ठाकूर आदींची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांच्या प्रस्ताविकाने झाली. त्यांनी कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करताना प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री यामागील उद्दिष्ट मांडले.

जि.प. उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी हा उपक्रम स्तुत्य असल्याचे नमूद केले तसेच बीजामृत शेतकरी उत्पादक कंपनी व ग्रोवेल शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या उत्पादनांच्या आकर्षक पॅकेजिंगचे विशेष कौतुक केले. महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना मोठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यानंतर मान्यवरांनी रोहा तालुक्यातील कृषी प्रक्रिया दारांनी उभारलेल्या विविध स्टॉलना भेट देऊन उत्पादने पाहिली व शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी धनंजय जोशी यांनी ग्रोवेल फार्मर प्रोड्युसर कंपनीतर्फे उत्पादित मालाची माहिती देत उत्पादन प्रक्रियेतील अडचणी व बाजारपेठेत विक्रीचे अनुभव मांडले. सुरेश जैन, गणेश भगत, संतोष दिवकर, राजेंद्र जाधव आदी शेतकऱ्यांनी आपल्या मनोगतातून अनुभव कथन करत इतरांना प्रेरणा दिली.



## पशुसंवर्धन विभागाचे पशुपालकांना आवाहन





**पाली : प्रतिनिधी**

ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना उपयुक्त ठरणार आहे. या योजने अंतर्गत दुग्ध व्यवसाय, शेळी–मेंढी पालन आणि कुक्कुटपालन यांसारख्या पूरक व्यवसायांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन विभागातर्फे करण्यात आले आहे.

या योजनेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे केवळ पशुधन वाटप न करता शेड उभारणी, विमा आणि आधुनिक साधनसामग्रीसाठीही मोठे अनुदान दिले जाणार आहे. ही योजना राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय अशा दोन स्वरूपात राबवण्यात येणार आहे.

या योजनेत अल्पभूधारक, अत्यल्प भूधारक, वनहक्क धारक आणि महिला बचत गटांना प्राधान्य दिले जाईल तसेच, महिलांसाठी ३०% ते ५०% आणि दिव्यांगांसाठी ५% आरक्षण ठेवण्यात आले आहे. लाभार्थ्यांकडे स्वतःची जमीन असणे किंवा पाच वर्षांचा भाडेपट्टा असणे अनिवार्य आहे.

विकसित महाराष्ट्र २०४७चे ध्येय गाठण्यासाठी पशुसंवर्धन क्षेत्राचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे. रायगड जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता इथल्या शेतकऱ्यांनी केवळ पारंपरिक शेतीवर अवलंबून न राहता मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा लाभ घ्यावा. ही योजना केवळ अनुदान देणारी नसून पशुपालकांना उद्योजक बनवणारी आहे. आम्ही जिल्ह्यात या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कटिबद्ध आहोत, अशी माहिती पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे रायगड जिल्हा उपायुक्त डॉ. सचिन देशपांडे यांनी दिली.

## हॅकाथॉनमध्ये नवघर शाळेला उत्तेजनार्थ बक्षीस

**पाली : प्रतिनिधी**

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद आणि एलईएफ संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय हॅकाथॉन स्पर्धेत सुधागड तालुक्यातील जि.प. शाळा नवघरच्या 'स्मार्ट अभ्यास मित्र' या प्रकल्पाने यश संपादन केले आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील निवडक ३४ प्रकल्पांमधून नवघर शाळेच्या या नाविन्यपूर्ण कोडिंग आधारित प्रकल्पाची 'टॉप १०'मध्ये निवड झाली असून उत्तेजनार्थ पारितोषिकाने त्यांना गौरविण्यात आले आहे.

शाळेतील इयत्ता सातवीचे विद्यार्थी खुशी वाघमारे, सामर्थ्य शिर्के आणि हर्षल सुतार यांनी या स्पर्धेत आपल्या तांत्रिक कौशल्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. 'स्मार्ट अभ्यास मित्र' हा प्रकल्प कोडिंगवर आधारित असून विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले वर्किंग मॉडेल आणि त्याचे उत्कृष्ट सादरीकरण यामुळे परीक्षकांनी या प्रकल्पाचे विशेष कौतुक केले.

या संपूर्ण प्रवासात शाळेचे मार्गदर्शक व आयडॉल शिक्षक राजेंद्र अंबिके यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. मुलांच्या कल्पनेला तांत्रिक जोड देऊन त्यांना कोडिंग आणि फिजिकल कॉम्प्युटिंगचे धडे देत त्यांनी हा प्रकल्प राज्यस्तरापर्यंत पोहचवला. शाळा, केंद्र, तालुका आणि जिल्हा अशा सर्व स्तरांवर यशस्वी घौडदौड करत रायगड जिल्ह्यातून राज्यस्तरासाठी निवड झालेली नवघर ही एकमेव शाळा ठरली आहे. यात टीमला लॅपटॉप, प्रमाणपत्र, मेडल, पुस्तक व फ्रिजमॅग्नेट असा भरगोस स्वरूपाचे बक्षीस प्राप्त झाले. या यशाबद्दल सुधागड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे, पेडली केंद्राचे केंद्रप्रमुख अनिल राणे तसेच नवघर शाळा व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे.

शाळेपासून सुरू झालेला हा प्रवास राज्यस्तरापर्यंत पोहचला याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. यातून केवळ यशच मिळाले नाही, तर विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या युगात नवीन काहीतरी शिकण्याची मोठी प्रेरणा मिळाली आहे, असे शिक्षक राजेंद्र अंबिके म्हणाले.



## तळा तालुका सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेची नवी कार्यकारिणी जाहीर



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुका सेवानिवृत्त कर्मचारी संघटना (संलग्न) रायगड जिल्हा सेवानिवृत्तांची संघटना या तालुका शाखेची नवनिर्वाचित संघटना कार्यकारिणीची निवड भानू मंचेकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. यावेळी अध्यक्षपदी अनंत वारे यांचे नाव आले. त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली

सचिवपदी दीपक ठाकूर, उपाध्यक्षपदी हसनमिया परदेशी, सहसचिव अरविंद जंगम, खजिनदार मनोहर चव्हाण, सदस्य गोविंद ठाकर, परशुराम गायकवाड, नामदेव भौड, जनाबाई पाटील, तनुजा मुळे, कल्पना गायकवाड, शांताराम नटे,दयानंद जानराव, प्रसिद्धी प्रमुख जनार्दन वडके या प्रमाणे नवनिर्वाचित कार्यकारिणी बिनविरोध निवड झाली आहे. नवनिर्वाचित कार्यकारिणीचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

नवे अध्यक्ष अनंत वारे यांनी मावळते अध्यक्ष भानू मंचेकर व सचिव जनार्दन वडके कार्यकारिणी यांनी जे संघटनेसाठी काम केले आहे, त्यांची प्रेरणा व मार्गदर्शन घेऊन चांगले काम करण्याचा प्रयत्न करू. अडीअडचणी सोडविण्यासाठी सदैव तयार राहू तसेच संघटना राबविण्यात असलेल्या उपक्रमांपेक्षा अधिक उपक्रम राबविणार आहोत, असे सांगितले.

मावळते अध्यक्ष भानू मंचेकर यांनी नवीन कार्यकारिणीस शुभेच्छा देऊन आम्ही नियमित तुमच्या सोबत राहू, असे सांगितले, तर मारूती शिर्के यांनीही आमचे सहकार्य नियमित राहील, असे म्हटले.

यावेळी संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मारुती शिर्के, जनार्दन वडके, पद्मा गाडगीळ, सविता जोशी, श्री.मुदगळ, श्री.पंदेरे, नामदेव तांबडे, श्री.मनवळ आदी उपस्थित होते. सर्वांनी कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या.

# आयपीएलला दुखापतींचे ग्रहण

## यंदा अनेक क्रिकेटपटू स्पर्धेबाहेर ; फ्रँचायझी चिंतेत

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६ सुरू होण्यास केवळ एक आठवडा शिल्लक असतानाच अनेक संघ दुखापतींशी झुंजत आहेत. १०पैकी आठ फ्रँचायझींना याचा फटका बसला आहे. दुखापतग्रस्त झालेले जवळपास सर्व क्रिकेटपटू गोलंदाज आहेत. सनरायझर्स हैदराबाद आणि लखनऊ सुपर जायंट्स या संघांना दुखापतींचा सर्वाधिक फटका बसण्याची चिन्हे आहेत.



आयपीएलच्या संघांबाबत आतापर्यंत उपलब्ध झालेल्या माहितीनुसार १५ क्रिकेटपटू विविध प्रकारच्या दुखापतींनी त्रस्त आहेत. काही क्रिकेटपटू संपूर्ण हंगामासाठी संघाबाहेर आहेत, तर काही सुरुवातीचे सामने खेळू शकणार नाहीत. काहींच्या दुखापतींविषयी अधिकृत माहिती अद्याप अपेक्षित आहे, पण या हंगामात त्यांचा सहभाग संशयास्पद मानला जात आहे.

कोलकाता नाईट रायडर्सचा खेळाडू हर्षित राणाच्या उजव्या गुडघ्याला दुखापत झाली आहे. तो संपूर्ण आयपीएल हंगामासाठी संघाबाहेर असेल. केकेआर त्याच्या जागी बदली क्रिकेटपटूच्या शोधात आहे.

पाठीच्या दुखापतीमुळे पॅट कमिन्स हा अनुभवी ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू सुरुवातीच्या सामन्यांसाठी सनरायझर्स हैदराबादच्या संघाबाहेर असेल. परिणामी फ्रँचायझीने इशान किशनला कर्णधार म्हणून नियुक्त केले आहे.

जोश हेझलवूड हा ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज गेल्या काही महिन्यांपासून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघाबाहेर आहे. तो हॅमस्ट्रिंग आणि घोट्याच्या दुखापतीने त्रस्त आहे. त्यामुळे तो आरसीबीच्या सुरुवातीच्या सामन्यांना मुकणार आहे. तो संघात कधी परत येईल हे अद्याप कळलेले नाही.

दिल्ली कॅपिटल्सचा मिचेल स्टार्क हा ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज दुखापतमुक्त आहे, पण कामाच्या ताणाचे व्यवस्थापन (वर्कलोड मॅनेजमेंट) करावे लागत असल्याने तो दिल्लीच्या सलामीच्या सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही.

चेन्नई सुपर किंग्सकडून खेळणारा ऑस्ट्रेलियचा वेगवान गोलंदाज नॅथन एलिस हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे खेळू शकणार नाही. तो संपूर्ण हंगामासाठी संघाबाहेर आहे. सॅम करन हा इंग्लिश अष्टपैलू क्रिकेटपटू मांडीच्या दुखापतीमुळे आयपीएल २०२मधून बाहेर मानला जात आहे. तो ट्रेडद्वारे चेन्नईकडून राजस्थान संघात दाखल झाला होता.

मुंबई इंडियन्सचा युवा गोलंदाज अथर्व अंकोलेकर गुडघ्याच्या दुखापतीने त्रस्त आहे. तो संपूर्ण हंगामासाठी मुंबईकडून उपलब्ध नसेल.

जॅक एडवर्ड्स हा ऑस्ट्रेलियन अष्टपैलू क्रिकेटपटूदेखील आयपीएल २०२६ला मुकणार आहे. लीगमध्ये खेळण्याची ही त्याची पहिलीच वेळ होती. पण पायाच्या दुखापतीमुळे एडवर्ड्स सनरायझर्स हैदराबाद संघाबाहेर गेला आहे.

राजस्थान रॉयल्स संघातील ॲडम मिल्ने हा न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीने त्रस्त आहे. यामुळे तो आयपीएलला मुकू शकतो.

श्रीलंकन वेगवान गोलंदाज मथिशा पाथिराना पोटरीच्या स्नायूला ताण आल्यामुळे कोलकाता नाईट रायडर्सच्या संघाबाहेर आहे. टी-२० विश्वचषकादरम्यान त्याला ही दुखापत झाली होती. तो पूर्वी चेन्नई सुपर किंग्स संघाचा भाग होता. वानिंदू हसरंगा हा श्रीलंकन लेग-स्पिनरदेखील जखमी आहे. टी-२० विश्वचषकादरम्यान त्याला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली होती. परिणामी तो लखनऊ सुपर जायंट्सच्या सुरुवातीच्या सामन्यांना मुकू शकतो.

लॉकी फर्ग्युसन (पंजाब किंग्स) या न्यूझीलंडच्या वेगवान गोलंदाजाने कौटुंबिक कारणांमुळे आयपीएल २०२६चे सुरुवातीचे सामने न खेळण्याचा निर्णय घेतला आहे.

ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू क्रिकेटपटू मॅथ्यू शॉर्ट (चेन्नई सुपर किंग्स) याच्या अंगठ्याला दुखापत झाली आहे. तो अद्याप दुखापतीतून सावरलेला नसून सुरुवातीच्या सामन्यांमधून बाहेर राहू शकतो.

इशान मलिंगा (सनरायझर्स हैदराबाद) हा श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज खांद्याच्या दुखापतीने त्रस्त आहे. याच कारणामुळे तो टी-२० विश्वचषकातून बाहेर झाला होता. आयपीएल २०२६मधील त्याचा सहभाग अनिश्चित आहे.



# उरण येथे आमदार चषक क्रिकेट स्पर्धा

**उरण : वार्ताहर**

उरण नगरपालिकेच्या मैदानावर जय हरी मित्र मंडळाच्या वतीने प्रकाशझोतातील आमदार चषक अंडर आर्म क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. २१, २२ व २३ मार्च अशी तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत एकूण ३२ संघांनी सहभाग घेतला आहे.

स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे उरण शहर अध्यक्ष तथा माजी नगरसेवक कौशिक शाह यांच्या हस्ते झाले. नगरसेवक जासिम गॅस, गणेश पाटील, नगरसेवक रोहित पाटील, ॲड.पराग म्हात्रे, माजी नगराध्यक्ष व विद्यमान नगरसेविका सायली म्हात्रे, नगरसेविका रजनी कोळी, पूर्वा वैवडे, सायली पाटेकर, माजी नगरसेवक राजेश कोळी, माजी नगरसेविका आशा शेलार, जान्हवी पंडित, युवा मोर्चा शहर अध्यक्ष निलेश पाटील, महिला मोर्चा शहर अध्यक्ष संपूर्णा थळी, मनन पटेल, विशाल पाटेकर, मनोहर सहतिया, उद्योजक कुणाल म्हात्रे, रोहित कोळी, करण कोळी, विराग पराडकर, दिपेश कोळी, संदीप तांडेल, निखील माळी, प्रमोद पाटील, मितेश कोळी, जगदीश पाटील, मुकेश घरत, योगेश वैवडे, कुणाल शिसोदिया, मुकेश थळी, कुंदन गायकवाड, कुणाल पाटील, विनोद रूपचंदानी, रोशनी थळी, समीर कुथे, कौफिक शेख, सुरेश घोसाळकर आदी उपस्थित होते.


स्पर्धेत प्रथम क्रमांक ५० हजार रुपये, द्वितीय २५ हजार, तृतीय व चतुर्थ प्रत्येकी १२,५०० असून चारही विजेत्यांना चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे मालिकावीरला टू व्हीलर, उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज व उत्कृष्ट क्षेत्रक्षक आदींना सायकल बक्षीस दिली जाणार आहेत.

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा

# सिकंदर, पृथ्वीराज, शिवराज, हर्षवर्धनची आगेकूच

**पुणे : प्रतिनिधी**

वाघोली येथे रंगलेल्या महाराष्ट्र केसरी मैदानात गतविजेत्या सिकंदर शेख, शिवराज राक्षे, पृथ्वीराज मोहोळ, पृथ्वीराज पाटील, हर्षवर्धन सदगीर यांनी स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत मजल मारली आहे. रामकृष्ण सातव पाटील कर्तव्य फाऊंडेशन आयोजित स्पर्धेत पाचही गतविजेत्या महाराष्ट्र केसरींनी अपेक्षेप्रमाणे लौकिकास साजेसे कुस्तीचे प्रदर्शन करून दिवस गाजविला.



यावेळी माऊली जमदाडे आणि असलम काजी यांनी उपस्थित राहून कुस्तीगीरांना प्रोत्साहन दिले तसेच अभिनेता गणेश परदेशी यांनीही स्पर्धास्थळी उपस्थित राहून कुस्तीचा आनंद घेत मल्लांचा उत्साह वाढवला.

स्पर्धेत विशेष लक्ष वेधून घेतले ते सिकंदर शेख याने. त्याला कुस्तीदरम्यान नाकाला इजा झाली होती, मात्र दुखापतीची पर्वा न करता त्याने आक्रमक खेळ कायम ठेवत दमदार विजय मिळवला. त्याच्या जिद्दीचे आणि लढाऊ वृत्तीचे प्रेक्षकांनी जोरदार कौतुक केले.

गादी विभागातील निकालांमध्ये सोलापूर शहराच्या जय पाटील याने चेतन रेपाळे अहिल्यानगर यांच्याविरुद्ध प्रेक्षणीय लढतीत २-० अशा फरकाने विजय मिळवला. पुणे शहराच्या श्रेयस होळकर आणि नांदेडच्या शिवराज राक्षे यांच्यात अत्यंत चुरशीची लढत झाली. या सामन्यात शिवराज राक्षे याने १-० अशा अल्प फरकाने विजय नोंदवला. सांगलीच्या सतपाल शिंदे याच्याविरुद्ध सोलापूर शहराच्या पृथ्वीराज पाटील याने ११-० अशा एकतर्फी फरकाने विजय मिळवला.

नाशिक शहराच्या हर्षवर्धन सदगीर याने अमरावतीच्या वेताळ शेळके याचा ८-१ अशा गुणांनी पराभव केला. सोलापूर जिल्ह्याच्या अक्षय मंगवडे याने कोल्हापूर जिल्ह्याच्या सुशांत तांबूळकर याच्यावर ३-१ अशी मात केली. पुणे जिल्ह्याच्या पृथ्वीराज मोहोळ याने धाराशिवच्या धीरज बारस्करला १२-२ अशा गुणांनी नमवले. अकोल्याच्या सिद्धांत गवई याने गडचिरोलीच्या संग्राम पाटीलला १३-३ अशा फरकाने पराभूत केले, तर साताऱ्याच्या दिग्विजय जाधव याने हिंगोलीच्या गजानन भोयरवर १०-० असा दणदणीत विजय मिळवला.

माती विभागातही कुस्त्या तेवढ्याच रंगल्या. सोलापूर शहराच्या रविराज चव्हाण याने धाराशिवच्या शिवराज लोकरे याचा १०-० अशा फरकाने पराभव केला. रत्नागिरीच्या संतोष दोरवड याच्याविरुद्ध कोल्हापूर जिल्ह्याच्या शुभम शिदनाळे याने ५-० असा विजय मिळवला. पुणे जिल्ह्याच्या सागर देवकातेला सोलापूर जिल्ह्याच्या महेंद्र गायकवाड याने १०-० अशा फरकाने पराभूत केले. सांगलीच्या इम्रान मुजावरला प्रतिस्पर्धी सिद्धेश पाटील (कल्याण) गैरहजर राहिल्याने विजय मिळाला.

पुणे जिल्ह्याच्या मनिष रायते आणि हिंगोलीच्या सिकंदर शेख यांच्यातील लढतीत सिकंदर शेखने ८-२ अशा गुणांनी विजय नोंदवला. नाशिक जिल्ह्याच्या बाळू बोडकेविरुद्ध गडचिरोलीच्या विक्रमसिंग भोसले याने ४-१ अशी मात केली. नंदुरबारच्या शशिकांत जमाळेला अहिल्यानगरच्या सुदर्शन कोतकरने ६-० अशा फरकाने पराभूत केले.

# रोहा खारापटी येथे होड्यांची स्पर्धा

## आई वैजयंती, कमळादेवी प्रथम

**रोहा : प्रतिनिधी**

गुढीपाडव्याच्या निमित्ताने रोहा तालुक्यातील खारापटी येथील गणेश आळी मित्र मंडळाच्या वतीने कुंडलिका नदीपात्रात आयोजित होड्यांची स्पर्धा रोमांचक झाली. यातील फायबर होडी स्पर्धेत किरण पोकळे यांच्या आई वैजयंती होडीने, तर लाकडी होडी स्पर्धेत निलेश चावरेकर यांच्या कमळादेवी होडीने प्रथम क्रमांक पटकावला.



या स्पर्धेत मोठा उत्साह दिसून आला. मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ स्पर्धा पाहण्यासाठी कुंडलिका नदीच्या तीरावर जमा झाले होते. गोफण येथून स्पर्धेला सुरुवात झाली आणि खारापटी बंदरावर या स्पर्धेचा समारोप करण्यात आला.

फायबर प्रकारात द्वितीय क्रमांक सुशील डोलकर, तृतीय अक्षर डोलकर, चतुर्थ मारुती वाघमारे आणि पाचवा क्रमांक प्रकाश चौलकर यांच्या होडीने प्राप्त केला. लाकडी होडी स्पर्धेत द्वितीय क्रमांक लिलाधर चावरेकर यांच्या महालक्ष्मी एक्सप्रेस होडीने मिळविला. विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेचे बक्षीस वितरण रोहा पंचायत समिती सदस्य सुरेश मगर, माजी सभापती राजश्री पोकळे, कोळी समाज अध्यक्ष जयवंत पोकळे, ओबीसी जनमोर्चा रोहा तालुका अध्यक्ष अनंत थिटे, माजी सरपंच राजेंद्र पोकळे, नगरसेवक देवेश जैन, उद्योजक सुनील चोरगे, ग्रामपंचायत सदस्य नैनिता डोलकर, नवनीत डोलकर, शेखर पाटील, मंडळाचे अध्यक्ष मिलनाथ नाईक, संतोष नाईक, मच्छिंद्र नाईक, नामदेव पोकळे, राकेश पाटील, अमोल पोकळे, कोळी समाज अध्यक्ष सुहास कारभारी आदी उपस्थित होते.

# टीम इंडिया जूनमध्ये करणार आयर्लंडचा दौरा

## टी-२० मालिकेचे वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) भारतीय संघाच्या आयर्लंड दौऱ्याची अधिकृत घोषणा शनिवारी (दि. २१) केली. जून महिन्यात अफगाणिस्तानविरुद्धची वनडे मालिका संपल्यानंतर भारतीय संघ आयर्लंडमध्ये दोन सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. विशेष म्हणजे २००७नंतर भारतीय संघ पहिल्यांदाच बेलफास्टमध्ये खेळताना दिसणार आहे.

भारत आणि आयर्लंडमधील दोन्ही टी-२० सामने बेलफास्ट येथे खेळवले जाणार आहे. पहिला सामना २६ जून आणि दुसरा २८ जून रोजी होणार आहे. भारतीय संघाने गेल्या आठ वर्षांत (२०१८, २०२२ आणि २०२३) तीन वेळा आयर्लंडचा दौरा केला आहे, मात्र बेलफास्टमध्ये १९ वर्षांनंतर हा पहिलाच दौरा असेल. या मालिकेनंतर १ ते १९ जुलैदरम्यान भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यावर जाणार असून तिथे पाच टी-२० आणि तीन वनडे सामने होणार आहेत.

नुकत्याच झालेल्या टी-२० विश्वचषकातील आयर्लंडची कामगिरी निराशाजनक राहिली होती, जिथे त्यांना चारपैकी केवळ एक सामना जिंकता आला होता.

# रवांडाच्या महिला क्रिकेटरचा पदार्पणातच विश्वविक्रम

**किगाली : वृत्तसंस्था**

रवांडाची १५ वर्षीय खेळाडू फॅनी उटागुशिमानिंदेने आपल्या पहिल्याच सामन्यात एक नव्हे तर दोन विश्वविक्रमांना गवसणी घातली. यामध्ये एक असा विक्रम आहे जो महिला क्रिकेटमधील इतर कोणत्याही खेळाडूने आजपर्यंत केलेला नाही.



फॅनी उटागुशिमानिंदे या महिला खेळाडूला घानाविरुद्ध नायजेरिया इन्विटेशन महिला टी-२० आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदार्पण करण्याची संधी मिळाली. १५ वर्षे आणि २२३ दिवस वय असताना तिने आपल्या पदार्पणाच्या सामन्यात ६५ चेंडूंमध्ये १७ चौकारांसह १११ धावांची शानदार खेळी केली. फॅनीच्या या शतकी खेळीसह तिच्या संघाने २० षटकांत २१० धावांचा डोंगर उभा केला, तर फॅनी उटागुशिमानिंदेने इतिहास घडवला.

या सामन्यापूर्वी पुरुष आणि महिला या दोन्ही गटांतील टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील सर्वात कमी वयातील शतकाचा विक्रम फ्रान्सच्या गुस्ताव्ह मॅकॉनच्या नावावर होता, ज्याने २०२२मध्ये स्वित्झर्लंडविरुद्ध १८ वर्षे आणि २८० दिवस वय असताना शतक झळकावले होते. आता हा विक्रम फॅनी उटागुशिमानिंदेच्या नावावर आहे.

फॅनीने महिलांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात पदार्पणातच सर्वात मोठी शतकी खेळी करण्याचा विक्रमही आपल्या नावे केला आहे. तिच्या खेळीपूर्वी हा विक्रम ऑस्ट्रेलिया महिला संघाची माजी खेळाडू कॅरेन रोल्टनच्या नावावर होता, जिने २००५मध्ये इंग्लंड महिला संघाविरुद्ध पदार्पणातच नाबाद ९६ धावा केल्या होत्या. यासोबतच फेनी आपल्या पदार्पणाच्या सामन्यात शतक झळकावणारी पहिली महिला खेळाडू ठरली आहे.



पनवेल : भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी पाले बुद्रुक येथे आयोजित पालेश्वरी चषक क्रिकेट स्पर्धेला भेट देत शुभेच्छा दिल्या. सोबत पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, यतीन पाटील आदी उपस्थित होते.



पनवेल : तालुक्यातील वलप येथे जय हनुमान अमन ब्रिगेड आणि रियांश इलेव्हन क्रिकेट संघाच्या वतीने स्व. एस.एस. पाटील व स्व.जनार्दन कमळाकर पाटील स्मृती चषक स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेस भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. सोबत पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, यतीन पाटील आदी उपस्थित होते.

# विराटचा आरसीबीला कडक संदेश

**बंगळुरू : वृत्तसंस्था**



आयपीएल २०२६चा हंगाम सुरू होण्याआधीच विराट कोहलीने आपल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला इशारा दिला आहे. एक मिनिटही वाया घालवू नका, पूर्णपणे स्विच ऑन व्हा, असे म्हणत बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियम येथे झालेल्या पहिल्या सराव सत्रात कोहलीने सहकाऱ्यांना गेल्या हंगामात मिळवलेल्या यशामागच्या मेहनतीची आठवण करून दिली.

विराटने सांगितले की, मागील दोन-तीन वर्षांत संघाने प्रचंड मेहनत घेतली आणि त्याचे फळ म्हणजे विजेतेपद, मात्र आता ही लढाई आणखी कठीण होणार आहे, कारण इतर सर्व संघ आरसीबीला हरवण्यासाठी पूर्ण ताकदीने मैदानात उतरणार आहेत. म्हणूनच विराटने संघातील प्रत्येक खेळाडूला सुरुवातीपासूनच तयारी करण्याचा सल्ला दिला आहे. हे दिवस वाया घालावू नका. प्रत्येक सराव सत्राचा पूर्ण उपयोग केला पाहिजे. पुढील अडीच महिने आपल्याला १२० टक्के देणे गरजेचे आहे, असे स्पष्ट शब्दांत त्याने सहकाऱ्यांना सूचित केले.

दरम्यान, आरसीबी आपला पहिला सामना २८ मार्च रोजी सनरायझर्स हैदराबाद संघाविरुद्ध याच मैदानावर खेळणार आहे. घरच्या मैदानावर सुरुवात होणार असल्याने संघासाठी ही जमेची बाजू आहे.

# आयसीसी टी-२० क्रमवारीत बुमराहची टॉप ५मध्ये एन्ट्री!

**मुंबई : प्रतिनिधी**



भारताने ८ मार्च रोजी टी-२० विश्वचषक जिंकल्यापासून एकही टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही आणि जुलैपर्यंत या फॉरमॅटमध्ये एकही सामना होणार नाही, पण वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने एकही सामना न खेळता आयसीसी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रमवारीत अव्वल ५मध्ये स्थान मिळवले आहे.

विश्वचषकानंतर दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यात काही टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले गेले, ज्या दरम्यान दक्षिण आफ्रिकेचा कॉर्बिन बॉश रेटिंग गुण गमावून सहाव्या स्थानावर घसरला, ज्यामुळे बुमराहला आयसीसी टी-२० आंतरराष्ट्रीय गोलंदाजांच्या क्रमवारीत एक स्थान वर येण्याची संधी मिळाली आणि तो ७०२ रेटिंग गुणांसह पाचव्या स्थानावर पोहचला आहे.

भारतीय चाहत्यांसाठी अभिमानाची बाब म्हणजे, भारताचा अभिषेक शर्मा टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानी कायम आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com